




# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १६२ * नांदेड * गुरूवार, दि. १८ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# 'ऑपरेशन टायगर' अन् लगेच आज नांदेडमध्ये विधान परिषद निवडणूक! मतदारांमध्ये संभ्रम!

**नांदेड (प्रतिनिधी)–** बुधवारी दिवसभर राज्यासह देशभर 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा होत होती. यातच आज गुरुवारी नांदेड विधान परिषदेची निवडणूक असून 'ऑपरेशन टायगर'चा थेट परिणाम आजच्या या निवडणुकीवर होईल असे दिसून येत आहे.

'ऑपरेशन टायगर'अंतर्गत हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर हे ठाकरे गट सोडून शिवसेना शिंदे गटात गेल्याचे सांगण्यात येत आहे. यातच त्यांचे पुत्र कृष्णा पाटील आष्टीकर हे महाविकास आघाडीतील ठाकरे गटाच्या पाठिंब्यावर या विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मग आता कृष्णा पाटील आष्टीकर यांना महाविकास आघाडीची मते मिळणार की, महायुतीचीही अशी चर्चा नांदेडमध्ये रंगली आहे. महायुतीने भाजपचे अमरनाथ राजूरकर यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केलेली आहे.

## कृष्णा आष्टीकर यांना नेमकी कुणाकुणाची मते मिळणार!



### राजूरकर महायुतीचे आणि खासदार आष्टीकरही महायुतीचे!

अशात अमरनाथ राजूरकरही महायुतीचे आणि नागेश पाटील आष्टीकरही महायुतीचेच अशी काहीशी संभ्रमाची स्थिती आजच्या विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने निर्माण झालेली आहे.

### काँग्रेस, महाविकास आघाडीमध्येही संभ्रम!

नांदेड विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाने ऐनवेळी आपले उमेदवार रामदास पाटील सुमठाणकर यांना अर्ज उमेदवारी अर्ज माघारी घेण्यास सांगितले. आणि शिवसेना ठाकरे गटाचे कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला. मात्र आता खासदार नागेश पाटील आष्टीकर हेच शिवसेना शिंदे गटासोबत अर्थात महायुतीसोबत गेल्याचे सांगण्यात येत असल्याने नांदेड जिल्ह्यात महाविकास आघाडीची आणि त्यातही काँग्रेसची मोठी कोंडी झालेली दिसत आहे.

### मतदान कोणाला?

काँग्रेसचे मतदार आता नेमके कुणाला मतदान करणार हा उत्सुकतेचा विषय ठरला आहे. काँग्रेस आष्टीकरांच्याच पाठीशी राहणार की, तटस्थ राहणार ? की तिसरे उमेदवार असणारे वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले यांना मतदान करण्याचा निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नांदेडहून खासदारांना घेऊन गेलेले ते 'चार्टर्ड फ्लाईट' चर्चेच्या केंद्रस्थानी




## मंगळवारी सायंकाळी आलेले स्पेशल फ्लाईट

**नांदेड (प्रतिनिधी)–** सध्या राज्यभरासह देशभरातील राजकीय वर्तुळात 'ऑपरेशन टायगर'ने खळबळ उडालेली आहे. यातच मंगळवारी नांदेड येथून खासदारांना घेऊन गेलेले 'स्पेशल चार्टर्ड फ्लाईट' या चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही नांदेडला आलेल्या या खास विमानाचा फोटो ट्विट करीत 'अपना सपना मनी मनी' अशी टीका केली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सुरू करण्यात आलेल्या षऑपरेशन टायगर'ची नांदेडमध्ये लगबग सुरू असल्याचे काल मंगळवारी दिसून आले. नांदेड विमानतळावर मंगळवारी सायंकाळी आलेल्या 'स्पेशल चार्टर्ड फ्लाईट'ने या चर्चांना तेजी आली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेल्या 'ऑपरेशन टायगर'च्या मोहिमेवर हे 'स्पेशल चार्टर्ड फ्लाईट' नांदेडमध्ये आल्याचे बोलले गेले. शिवसेना ठाकरे गटाचे सहा खासदार फुटणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती, याच मोहिमेवर हे 'स्पेशल चार्टर्ड फ्लाईट' नांदेडला आल्याचे बुधवारच्या राजकीय घडामोडींवरून स्पष्ट झाले आहे.

शिवसेना ठाकरे गटातून फुटून सहा खासदार स्वतंत्र गट स्थापन करणार असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार बुधवारी या सहा खासदारांनी दिल्लीत लोकसभा सभापतींची भेट घेतल्याचेही सांगण्यात येत आहे.

### नांदेड मार्गे दिल्ली

ठाकरे गटातून फुटणाऱ्या खासदारांमध्ये नांदेडच्या आसपासचे खासदार असल्याचे सांगितले गेले. यातील तीन खासदार हे नांदेडच्या आसपासच्या जिल्ह्यातील खासदार आहेत. नांदेड विमानतळावरून उड्डाण घेणे त्यांना सोयीचे असल्याने, नांदेड विमानतळावरून त्यांना घेऊन जाण्यासाठी या स्पेशल चार्टर्ड फ्लाईटची व्यवस्था करण्यात आली होती, हे बुधवारच्या राजकीय घडामोडींवरून स्पष्ट झाले आहे. नांदेडच्या आसपास हिंगोली, परभणी त्याचबरोबर यवतमाळ हे लोकसभा मतदारसंघ आहेत.

नागेश पाटील आष्टीकर (हिंगोली), संजय उर्फ बंडू जाधव (परभणी), संजय देशमुख (यवतमाळ) हे या लोकसभा मतदारसंघाचे खासदार असून ते ठाकरे गट सोडून एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेल्याचे आजच्या राजकीय घडामोडींवरून दिसून येत आहे. दरम्यान नांदेड आणि नांदेडला आलेले ती 'स्पेशल चार्टर्ड फ्लाईट' हे यानिमित्ताने चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे.

# ऑपरेशन टायगर : ठाकरे गटाचे सहा खासदार शिंदे गटात? लोकसभा अध्यक्षांना पत्र देणार

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** शिवसेना ठाकरेंच्या पक्षाचे सहा खासदार हे शिवसेना एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात होती. त्या चर्चेवर बुधवारी शिक्कामोर्तब झालं आहे. पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गट फुटीच्या उंबरठ्यावर उभा आहे, दिल्लीसह राज्यातही घडामोडींना वेग आला आहे. ठाकरेंचे सहा खासदार दिल्लीत गेल्याची माहिती आहे.

ठाकरेंच्या शिवसेनेचे सहा खासदार दिल्लीमध्ये अज्ञात स्थळी असल्याची माहिती समोर आली आहे. श्रीकांत शिंदे यांच्या शासकीय निवासस्थानी बैठक नियोजित होती. मात्र त्या ठिकाणी हे खासदार एकत्र न येता त्यांनी दिल्लीतच एका ठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याची सुत्रांची माहिती आहे. तर फुटलेला गट आपल्या सह्यांचे पत्र सोबत घेऊन लोकसभा अध्यक्षांना भेटून ही सगळी प्रक्रिया पूर्ण करणार असल्याची शिवसेनेतील वरिष्ठ नेत्याची माहिती आहे. काही कायदेशीर सल्ले आणि काही तांत्रिक अडचणी दूर करून पुढची प्रक्रिया केली जाणार असल्याची माहिती आहे.

तर एनडीएच्या बैठकीनंतर 'ऑपरेशन टायगर'वर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती समोर आलेली आहे. १० जूनला दिल्लीतील एका पंचतारांकित हॉटेलमधे ठाकरेंच्या खासदारांनी एकनाथ शिंदेंची भेट घेतली होती. रात्री ११ वाजता एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीला ओमराजे निंबाळकर देखील दिल्लीत उपस्थित असल्याची सूत्रांची माहिती आहे.



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात 'ऑपरेशन टायगर' ही चर्चेचा विषय बनली आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतील नऊ खासदारांपैकी सात खासदार पक्षांतर करत असल्याच्या चर्चा सुरू होत्या. ठाकरेंचे हे खासदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत लवकरच प्रवेश करतील असा दावा केला जात आहे.

### तांत्रिक बाबींमुळे पुरावे दिले नाहीत, शिंदेंच्या शिवसेनेचा दावा

शिवसेनेचं ऑपरेशन टायगर हे यशस्वी झालं असून काही तांत्रिक अडचणींमुळे त्याचे पुरावे समोर आणले नाहीत, मात्र ठाकरेंचे कायदेशीर डावपेच बघूनच पुढची पावलं टाकली जातील, असं शिंदेंच्या शिवसेनेच्या गोटातून सांगण्यात आलं आहे. येत्या दोन दिवसांत तरी अधिकृतरित्या काहीही समोर आणलं जाणार नाही, अशी माहिती शिवसेनेच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली.

# विधान परिषद निवडणुकीसाठी काँग्रेसने काढला व्हीप

## कृष्णा पाटील आष्टीकरांच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाविकास आघाडी पुरस्कृत उमेदवार कृष्णा पाटील आष्टीकर यांनाच मतदान करण्याचे आदेश काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहेत. यानूसार जिल्हाध्यक्ष खा. रवींद्र चव्हाण यांनी याबाबतचा व्हीप काढला आहे.

विधान परिषदेसाठी गुरुवार दि. १८ जून रोजी मतदान होणार असून कृष्णा पाटील आष्टीकर हे महाविकास आघाडीचे पुरस्कृत उमेदवार आहेत. यामुळे काँग्रेस पक्षाचे आदेश असून पाटील यांना काँग्रेसने पाठिंब दिला आहे. यानूसार प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महापालिका, नगरपालिका, सर्व नगरपरिषद, नगर पंचायतीतील काँग्रेस नगरसेवकांनी महाविकास आघाडीचे उमेदवार आष्टीकर यांनाच मतदान करावे असा व्हीप काढण्यात आला आहे. यामुळे काँग्रेस नगरसेवकांत संभ्रम निर्माण झाला आहे. कारण उबाठा सेनेचे खा. नागेश पाटील आष्टीकर हे शिंदे शिवसेनेत सहभागी होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. यात त्यांच्या पुत्राला मतदान करण्याचे आदेश दिल्याने वंचित बहुजन आघाडीमध्ये मात्र संतापाचे वातावरण पसरले आहे.

# नांदेड विधान परिषद निवडणूक: काँग्रेसच्या भूमिकेवर प्रशांत इंगोले यांनी उपस्थित केले सवाल



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार इंजि. प्रशांत इंगोले यांनी काँग्रेस पक्षाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी, काँग्रेस नेतृत्त्वावर भाजपशी संबंधित व्यक्तींना अप्रत्यक्ष पाठिंबा देत असल्याचा आरोप केला. यावेळी राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद यांची उपस्थिती होती.

इंगोले यांनी सांगितले की, नांदेड महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसची पहिली पसंती रामदास पाटील सुमठाणकर यांना होती. सुमठाणकर यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे हिंगोली लोकसभा प्रभारी म्हणून काम केले होते. तसेच त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी चर्चेनंतर घेतला होता, असा दावा त्यांनी केला.

नागेश पाटील आष्टीकर हे भविष्यात शिवसेना (शिंदे गट) मध्ये जाण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चाचा उल्लेख करत, कृष्णा आष्टीकर यांना पाठींबा देण्याच्या काँग्रेसच्या राजकीय भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले.

काँग्रेससमोर वंचित बहुजन आघाडीसारख्या स्वतंत्र आंबेडकरवादी आणि भाजपविरोधी शक्तीला पाठिंबा देण्याचा पर्याय उपलब्ध असताना त्यांनी भाजपशी संबंधित असल्याचा आरोप असलेल्या उमेदवाराला पाठिंबा देणे पसंत केले. यामुळे काँग्रेसची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे, असेही इंगोले यांनी म्हटले.

# विधानपरिषद निवडणूक मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू


**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधान परिषद नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या मतदानाची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून तसेच निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी यादृष्टीने गुरुवार, दि. १८ जून २०२६ रोजी मतदान केंद्र परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत, असे जिल्हादंडाधिकारी नांदेड कार्यालयानी कळविले आहे. हा आदेश मतदान सुरु झाल्यापासून मतदान संपेपर्यत राहणार आहे.

# महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांना एक वर्षाची मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या विकासासाठी सतत ३ वर्ष पुढाकार घेत अनेक प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी प्रशासकराज काळात चांगले काम केले. या कामाची दखल घेऊन शासनाने त्यांना नांदेड महापालिकेतच १ वर्षाची मुदतवाढ दिली आहे.



नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी ३ वर्षांपुर्वी पदभार घेतला. हा पदभार घेताच त्यांनी प्रशासकीय कामाला शिस्त लावली. महापालिकेचे उत्पन्न कसे वाढेल यासाठी भर दिला. काबरानगर जलशुद्धीकरण केंद्र, लेबरकॉलनी येथील जागेत व्यापारी संकुल साकारले. नियमित आणि थकित पाणी व मालमत्ता कर वसुलीवर भर दिला. लोक अदालत, शास्ती माफीचा प्रयोग राबवून कोट्यावधी रूपयांची कर वसुली केली. पाणी पुरवठा योजना, रमाई घरकुल, पंतप्रधान आवास योजनेला गती दिली. त्यामुळे त्यांना एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबतचे शासन आदेश नुकतेच त्यांना प्राप्त झाले आहेत.









**नांदेड** : राष्ट्रवीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी खा. रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, शहर जिल्हाध्यक्ष अब्दूल गफार, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, कृउबाचे संचालक पप्पू कोंढेकर, पवनसिंह बैस, एनएसयुआय जिल्हाध्यक्ष सुरज शिंदे, किरण पडलवार, प्रवीण कानगुले, गणेश कोकाटे, भगवानसिंह चंदेल, गोविंद चौधरी, शरद चौधरी, अर्जुन ठाकूर, भवानीसिंह गहलोत, विठ्ठलसिंह गहेरवार, विजयसिंह गहेरवार, नारायण चव्हाण, संतोष चौधरी, गणेश चव्हाण, रवी परिहार, जगदीश ठाकूर, राम चव्हाण, देवा चंदेल, राजू चंदेल, प्रमोद ठाकूर, उद्धव कल्याणकर, महेश ठाकूर, किशोर वाघदडीकर, गिरीश वानखेडे दिसत आहेत. दुसऱ्या छायाचित्रात शिवसेनेकडूनही राष्ट्रवीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. बालाजी कल्याणकर, सहसंपर्कप्रमुख दर्शनसिंघ सिद्धू, जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, धनंजय पावडे, दिलीपसिंघ सोडी, श्याम कोकाटे, सुशील चव्हाण, महेश तिडके, सचिन पोफळे, सुनील पाटील, रवी खालसा, अजयसिंह चौहान, बालासाहेब पावडे आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# राजधानीत दहशतवादी कट उधळला!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशाची राजधानी दिल्ली पुन्हा एकदा दहशतवादी कारवायांच्या सावटाखाली आल्याचे समोर आले आहे. पाकिस्तानची गुप्तहेर संस्था आयएसआय समर्थित असल्याचा संशय असलेल्या एका मोठ्या नेटवर्कचा दिल्ली पोलिसांनी पर्दाफाश केला असून शस्त्रास्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलच्या ईस्टर्न रेंज पथकाने ही मोठी कारवाई करत संभाव्य दहशतवादी कट हाणून पाडला. प्राथमिक तपासात अटक करण्यात आलेल्या आरोपींचे संबंध पाकिस्तानातील कुख्यात गँगस्टर ते दहशतवादी बनलेल्या शहजाद भट्टी आणि त्याचा सहकारी अजमल गुजर यांच्या नेटवर्कशी असल्याचे उघड झाले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# बिनविरोध निवडणुका...

विधान परिषदेच्या नांदेड येथील स्थानिक स्वराज्य संस्थेतून आज होणाऱ्या निवडणुकीमध्ये बिनविरोध निवड होण्याची शक्यता जरी कमी असली तरी ती पूर्णपणे नाकारता येत नाही. याचा प्रत्यय आपल्याला नुकताच आला आहे. विधान परिषद निवडणुकांमध्ये महायुतीने पुन्हा एकदा बिनविरोध विजयाचा फॉर्म्युला यशस्वी करून दाखवला आहे. कोकणातील सर्व जागा बिनविरोध जिंकत सत्ताधारी आघाडीने आपली राजकीय आणि संघटनात्मक ताकद अधोरेखित केली असली, तरी या यशाच्या जल्लोषा-मागे लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. निवडणूक म्हणजे केवळ विजयी उमेदवार निवडून येण्याची प्रक्रिया नसून मतदारांना आपला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार बजावण्याची संधी असते. बिनविरोध निवडणुकांच्या वाढत्या पायंड्यामुळे हा अधिकारच हिरावला जात असल्याची चिंता व्यक्त होत आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात बिनविरोध निवडणुकांचा एक नवा पॅटर्न तयार होताना दिसत आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि आता विधान परिषद निवडणुकांमध्येही हा प्रकार सातत्याने घडत आहे. विरोधकांना निवडणुकीच्या रिंगणातूनच बाहेर काढण्याची रणनीती सत्ताधारी पक्षांनी प्रभावीपणे राबविली आहे. काही ठिकाणी राजकीय दबाव, काही ठिकाणी तडजोडी, तर काही ठिकाणी अंतर्गत मतभेद यामुळे उमेदवार माघार घेत आहेत. परिणामी निवडणूक लढण्याआधीच निकाल निश्चित होऊ लागले आहेत. हेच आपल्याला ठाणे, रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे, अहिल्यानगर तसेच वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली या ठिकाणच्या निवडणुकीवरून लक्षात येते. अशा अनेक जागांवर उमेदवार माघारीमुळे निवडणुका न होताच विजेते निश्चित झाले. यामुळे सत्ताधारी पक्षांची राजकीय ताकद दिसून येत असली, तरी लोकशाही प्रक्रियेला वळसा घालून मिळवलेला विजय कितपत अभिमानास्पद मानायचा, हा खरा प्रश्न आहे. निवडणूक ही लोकशाहीची परीक्षा असते. त्या परीक्षेलाच सामोरे न जाता विजय मिळवणे म्हणजे लोकशाहीच्या आत्म्यालाच धक्का देणे होय. लोकशाही-मध्ये स्पर्धा ही अनिवार्य असते. मतदारांना पर्याय उपलब्ध असणे हेच लोकशाहीचे सौंदर्य आहे, नव्हे तर ते अनिवार्य आहे. एखाद्या मतदारसंघात एकच उमेदवार उरतो आणि मतदानाची गरजच भासत नाही, तेव्हा त्या मतदारसंघातील मतदारांचा घटनादत्त मतदानाचा अधिकार प्रत्यक्षात निष्प्रभ ठरतो. प्रतिनिधी कोण असावा, याचा निर्णय मतदारांनी घ्यायचा की राजकीय पक्षांनी परस्पर तडजोडीतून घ्यायचा, हा मूलभूत प्रश्न यामुळे निर्माण होतो. यावेळी विरोधकांच्या कमकुवत संघटनात्मक स्थितीचेही दर्शन घडले. महाविकास आघाडीने सुरुवातीला सर्व जागा लढवण्याची भूमिका घेतली होती; मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी उमेदवारांनी माघार घेतली. काही ठिकाणी पक्षांतर्गत विसंवाद, तर काही ठिकाणी राजकीय गणिते यामुळे विरोधी पक्ष स्वतःच मागे हटले. याचा थेट फायदा महायुतीला झाला. लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना कडवे आव्हान देणारी आघाडी विधानसभा आणि विधान परिषद निवडणुकांमध्ये मात्र सातत्याने पिछाडीवर पडताना दिसत आहे. तथापि, या परिस्थितीसाठी केवळ विरोधकांनाच दोष देता येणार नाही. लोकशाही-मध्ये सक्षम विरोधी पक्ष ही शासनव्यवस्थेची गरज असते. विरोधक कमकुवत होणे किंवा निवडणूक प्रक्रियेतूनच बाहेर फेकले जाणे हे कोणत्याही लोकशाहीसाठी आरोग्यदायी लक्षण नाही. सत्ताधारी पक्ष मजबूत असावा, परंतु विरोधक अस्तित्वहीन व्हावेत, अशी अपेक्षा लोकशाही व्यवस्थेत कधीच नसते. बिनविरोध निवडणुकांचा वाढता कल हा राजकीय व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. आज तो विधान परिषद निवडणुकांपुरता मर्यादित असला, तरी उद्या स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर निवडणुकांमध्येही तो अधिक व्यापक स्वरूप धारण करू शकतो. अशा वेळी म तदारांची भूमिका केवळ प्रेक्षकाची राहील. मतदान केंद्रांवर जाऊन आपला कौल देण्याचा अधिकार हा लोकशाहीचा पाया आहे. हा पाया दुर्बल झाला, तर लोकशाहीची इमारत कितीही मजबूत दिसली तरी तिचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. महायुतीच्या या यशाचे राजकीय विश्लेषण करता येईल. विरोधकांच्या अपयशाची कारणेही शोधता येतील; परंतु या सर्वांपलीकडे जाऊन एक प्रश्न विचारणे आवश्यक आहे की, बिनविरोध निवडणुका वाढत असतील, तर लोकशाही अधिक बळकट होत आहे की मतदारांच्या हातातील अधिकार कमी होत आहेत? निवडणूक टाळून मिळालेला विजय हा राजकीय व तांत्रिकदृष्ट्या फायदेशीर असू शकतो; मात्र लोकशाहीच्या दृष्टीने तो विजय नसून अस्तित्त्व संदर्भात धोक्याचा इशारा आहे. मतदारांना मतदान करण्याची संधी नाकारली जाणे हे कोणत्याही प्रगत लोकशाहीसाठी अभिमानाचे नव्हे, तर चिंतेचे कारण आहे.

# चांगले कर्म व चांगले विचारच उन्नतीचा मार्ग



खून...खून म्हणजे केवळ माणसाचीच हत्या नाही तर या प्रकारात पशूपक्षांचीही हत्या असा याचा अर्थ काढता येईल. पशूपक्षांची हत्या? हा काय विचित्र प्रकार आहे. असा प्रश्न कोणालाही अगदी सहज पडू शकतो. परंतु तो प्रश्न वास्तविक प्रश्न आहे. कारण पशूपक्षांनाही जीव असतो आणि त्यांचीही हत्या केली तरी त्याचेही गंभीर परिणाम आपल्याला भोगावेच लागतात. ज्याला कोणत्याच स्वरुपाचं प्रायश्चित नाही. म्हणूनच जो कोणी मुक्या प्राणीमात्रांचीही हत्या करीत असतील. तो कधीच सुखी राहात नाही. हं, शरीरानं धडधाकट असलं म्हणजे सुख नसतंच. सुख असतं त्या माणसाचं आनंदी असण्यात. त्या माणसाच्या आनंदी वागण्यात. जर त्या व्यक्तीला आनंदी वागता येत नसेल वा आनंदानं जगता येत नसेल तर त्याच्यासारखा दुःखी माणूस जगात नाही. हे तेवढंच खरं. म्हणूनच माणसानं कोणाचाही खून करू नये. मग ते प्राणीमात्रा काही असेना. कारण प्राणीमात्रातही सृष्टीचे महत्वाचे घटकच आहेत.

सध्याच्या काळात गुन्हेगारी वृत्ती वाढत आहे. कोणी मद्यधुंद होवून वाहन चालवून रस्त्यावर झोपलेल्यांचा बळी घेतात तर कोणी अनेकांचा खून करीत सुटतात. कोणी आपल्या मुलीचा गळा घोटतात तर कोणी आपल्या मायबापांचा जीव घेतात. याला जबाबदार कोण? याला जबाबदार आहेत पोलीस की जनता? असा प्रश्न सामान्य माणसांनाही अगदी सहज पडल्याशिवाय राहात नाही. कारण दोघांचीही भूमिका ही संशयास्पदच असते.

कधी कधी जेव्हा खून होतो, तेव्हा त्या खुनाच्या बाबतीत काही लोकं म्हणतात की, काही बोलू नये यावर. खून झालाच नसता. परंतु पोलीस उशिरा पोहोचले ना. मग खून होणारच.

खुनाच्या बाबतीत सांगायचं झाल्यास खून होणारच. कारण पोलीस पोहोचले नाहीत. जर पोलीस पोहोचले असते तर खून झाला नसता काय? खून झालाच असता, जरी पोलीस उपस्थित असते तरीही. कारण ते थांबवू शकले नसते खून करणाऱ्यांना. त्याचं कारण असतं भीती. पोलीसही काही देवाचे बाप नाहीत की ते आपला जीव धोक्यात घालतील. त्यांनाही भीती असते की जर ते आडवे झाले व त्यांनी खून थांबविण्याचा प्रयत्न केलाच तर संबंधित खून करणारा व्यक्ती त्या पोलिसांचाही जीव घेईलच ही गोष्ट नाकारता येत नाही. याउलट कधीकधी नव्हे तर एखाद्या वेळेसच चमत्कार घडतो व पोलीस दिसताच खुन करणारी माणसं पळून जाऊन अनर्थ टळतो.

पोलिसांची भूमिका नेहमीच संदिग्ध राहिलेली आहे. त्याला कारणीभूत असतात काही पोलीस मंडळी. त्या पोलीस मंडळींनी जर आपली ड्युटी इमानेइतबारे बजावली तर गुन्ह्यांची संख्या निश्चीतच कमी होईल. परंतु ते तपास जेव्हा करायला सुरुवात करतात, तेव्हा वेळ निघून गेलेली असते. ज्यातून गुन्हेगार हा अगदी सहजरित्या वाचत असतो. तो मोकळा सुटत असतो. ज्याची परियंती त्या गुन्हेगाराची हिंमत वाढते व तो दुसरा गुन्हा करण्यास मोकळा होतो. परंतु म्हणतात ना. कितीही सराईत गुन्हेगार असला तरी तो एक ना एक दिवस जाळ्यात सापडतोच पोलिसांच्या आणि पोलिसांच्या जाळ्यात नाही सापडला तर विधात्यांच्या जाळ्यात तो नक्कीच सापडतो हे तेवढंच खरं. याबाबतीत एक प्रसंग सांगतो.

एक शाळा व त्या शाळेतील मुख्याध्यापक रोजच अत्याचार करायचा आपल्या कनिष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांवर. अशातच तो धमक्या देवून देण वसूल करायचा शाळेतून. देण म्हणून वसूल करीत असलेला पैसा एखाद्या शिक्षकानं देण्यास नकार दिल्यास त्याचे वेतनही बंद करायचा तो कायमस्वरुपानं. यावर संबंधित शिक्षक पोलीस ठाण्यात गेल्यास पोलिसांना सेटींग करून संबंधित शिक्षकांनाच वेठीस धरण्यास सांगायचा तो. त्यानंतर शिक्षकानं न्यायालयात जाब मागितल्यास न्यायालयातूनही क्लीनचीट मिळायची त्याला. ज्यातून अख्खे वेतन बुडायचे शिक्षकाचे. यातूनच त्याची हिंमत वाढली. त्याच्या या अत्याचारानं कित्येक शिक्षकाच्या नोकऱ्या गेल्या. परंतु मुख्याध्यापक जो की तो राहिला. तसा मुख्याध्यापक विद्यार्थ्यांकडूनही बराच पैसा खायचा. त्यांना येत असलेल्या खिचडीतून पैसा खायचा. यातूनच त्याचं आर्थिक उत्पन्न बरंच वाढलं होतं व तो गर्भश्रीमंत बनला होता. त्याच श्रीमंतीचा त्याला अतीव गर्वही चढला होता. मात्र त्याचे शिक्षकांवर होत असलेले अत्याचार व त्याचे विद्यार्थ्यांप्रती व पालकांप्रती वागणे, नियती पाहात होती. ती बोलत नव्हती आणि त्याच नियतीला बोलताही येत नव्हतं. अशातच एक दिवस असाही उजळला.

तो एक दिवस. त्या दिवशी तो सकाळीच आपल्या टूर व्हिलरनं फिरायला निघाला व वाटेतच एक सुक्ष्म अपघात झाला. ज्यात त्याला गंभीर लागलेलं जाणवत नव्हतं. परंतु मेंदूला मार लागला होता. ज्यात तो जागीच मरण पावला. महत्व पूर्ण बाब ही की आपण जसे कर्म करतो. त्याची शिक्षा आपल्याला मिळतेच. प्रसंगी थोडा वेळ लागतो. म्हणूनच चांगले कर्म करावे.

कधीकधी पोलिसांच्या संशयाच्या भूमिकेमुळे गुन्हेगार सुटतात. मग ते अव्वल दर्जाचे गुन्हेगार बनतात. परंतु नियती त्यांना सोडत असते काय? जे दुसऱ्याचा खून जरी करुन मोकळे सुटत असले तरी ते नियतीच्या कचाट्यातून सुटत नाहीत. त्या खुनाऱ्यांच्या घरात एवढे सारे विघ्न येतात की, त्याचं जगणं कठीण होवून बसतं. कधी गंभीर आजार तर कधी त्यांच्या स्वतःच्या मुलांचं घरातून पळून जाणं वा मरणं वा सोडून जाणं. कधी पैशाची अडचण. कधी विवाह न जुळणे, कधी घरात जास्तीचा लठ्ठपणा. कधी मरणासन्न यातना. कधी मधूमेह तर कधी हाय ब्लडप्रेशर अन् लोकं आपल्यावर आलेल्या यातना सहन करु शकतात. परंतु जेव्हा त्यांच्या मुलांचे गंभीर हाल होतात. ते मात्र कोणीही सहन करु शकत नाही. अशा गोष्टीचा आपल्याला भयंकर त्रास होतो. त्यावेळेस आपल्याला विधाता आठवतो आणि आपण रोज विधात्याला आळवत बसतो. कधी प्रचंड स्वरुपाची पूजापाठ तर कधी नदीत अभंग स्नान करणं, विचार करतोय की नदीत अभंग स्नान केल्यानं आपलं पाप खंडित होईल. परंतु जसा एखाद्या कपड्यावरचा डाग धुतला जात नाही. तसंच हे आपलं पाप असतं. गुन्हेगारीचं पाप. त्या पापाची ना नदीत अंघोळ केल्यानं सुटका होत ना कोणत्या देवालयात गेल्यानं. जरी त्या पापाला पोलिसांकडून न्याय मिळाला नसेल तरीही त्या गुन्ह्याला शिक्षा देण्याचं काम नियती करतेच करते. म्हणूनच कोणतंही पाप का असेना, ते करूच नये. जरी एखाद्या सुक्ष्मातीत सुक्ष्म जीव मारण्याचं पाप का असेना. तेही जीव मारणं हे पापच असते आणि नियती त्याचीही शिक्षाही देतच असते. विशेष म्हणजे गुन्हे घडत जरी असले तरी त्याला थांबवायची ताकद ही पोलीस व जनतेमध्ये आहे आणि तेही सक्षमपणे काम करीत नसतील तर नियती त्यावर अतिशय सक्षमपणे काम करीत असते. ती ज्याच्या-त्याच्या कर्माची शिक्षा त्याला त्या स्वरुपात देत असते. मग आपण कितीही पूजापाठ केली वा कितीही वेळा अभंग स्नान केले तरीही आपण नियतीच्या कचाट्यातून कधीही सुटू शकत नाही. म्हणूनच कोणतंही पाप करण्यापूर्वी सतरावेळा विचार करावा. मगच पाप करावं हे तेवढंच खरं.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# फ्लाईंग सीख मिल्खा सिंग

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग सीख मिल्खा सिंग यांची आज पुण्यतिथी. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब सीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली.

यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० म ीटरच्या शर्यतीत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले.

या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५.७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफर्मनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेम ींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची




भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांच्या पत्नीचेही नुकतेच कोरोनाने निधन झाले आहे. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे प्रमुख पाकिस्तानचे माजी प्रमुख आयुब खान यांनी दिली.

१९६० साली पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तान-मध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तान-मध्येही ते खूप लोकप्रिय झाले ही स्पर्धा पाहण्यासाठी आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धे नंतरच आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकारनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अखतर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती.

मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे तीन वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. मिल्खा सिंग यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र आदरांजली!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# चला, सहलीला जाऊया!



आज आपण आंतरराष्ट्रीय सहल दिवसाविषयी अधिक सविस्तरपणे माहिती जाणून घेणार आहोत. ज्यात आंतरराष्ट्रीय सहल दिवस कधी आणि केव्हा साजरा केला जातो? कशा पद्धतीने साजरा केला जातो? का साजरा केला जातो? हा दिवस साजरा करण्यामागचा मूळ इतिहास काय आहे? इत्यादी महत्वाच्या बाबींचा आढावा घेणार आहोत.

सहल म्हटले की, पहिले आपल्याला आपले शाळेचे दिवस आठवतात, कारण लहान असताना नेहमी आपल्या शाळेची कुठेतरी ऐतिहासिक तसेच निसर्गरम्य स्थळी सहल जायची. त्यामुळे सहल ही आपणांस लहानपणापासूनच माहीत आहे. पण आता सहल ही शाळेत जात असलेल्या लहान मुलांपुरतीच सीमित राहिलेली नाही, तर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचीच आवडती गोष्ट झाली आहे. आपल्या कुटुंबासोबत वेळ व्यतीत करण्याचे हे एक उत्तम साधन तसेच माध्यम बनले आहे.

आंतरराष्ट्रीय सहल दिवस हा दरवर्षी १८ जून रोजी साजरा केला जातो. दरवर्षी आंतरराष्ट्रीय सहल दिवस साजरा करण्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे रोजच्या धकाधकीच्या जीवनातून वेळ काढून आपण प्रत्येक व्यक्तीने आपल्या फॅमिलीसोबत एक चांगला वेळ व्यतीत करायला हवा. त्यांच्यासोबत बाहेर एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी सहलीला जायला हवे. त्यांना आपण आपल्या कामातून सवड काढून वेळ द्यावा, त्यांच्याशी संवाद साधावा, हेच समजावून सांगण्यासाठी आणि आपणांस आपल्या जीवनातील सहलीचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा करण्यात येतो.

आंतरराष्ट्रीय सहल दिनाच्या दिवशी सर्व फॅमिली, मित्र, मैत्रिणी जमतात आणि निसर्गाच्या सान्निध्यात किंवा एखाद्या आपल्या आवडत्या पर्यटनस्थळी जातात. तेथे पर्यटनाचा आनंद घेतात. मनावरील ताणतणाव येथे झटकून मन हलके केले जाते. तंबू गाडून तेथे पिकनिकचा आनंद साजरा करतात किंवा याच दिवशी लहान मुले गार्डनमध्ये जाऊन खेळतात. स्विमिंग पूलमध्ये स्वीमिंग करतात. खूप खेळता, बागडता गप्पा-गोष्टी करतात. बाहेरगावी एखाद्या पाहण्याजोग्या स्थळी ट्रिपला जातात. तर मोठी माणसे याचदिवशी एखाद्या धार्मिक देवस्थानाला भेट देतात. शाळेत देखील हा दिवस एखाद्या सुट्टीप्रमाणे साजरा केला जातो. या दिवशी सर्व शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना घेऊन एखाद्या बगीचात जातात किंवा एखाद्या समुद्रकिनारी, निसर्गसौंदर्य असलेल्या किंवा ऐतिहासिक स्थळी जातात. तेथील ज्ञानवर्धक माहिती टिपून घेतात.

आंतरराष्ट्रीय सहल दिवसाचा इतिहास असा कथन केला जातो- आंतरराष्ट्रीय सहल दिवस हा फ्रान्स या देशात एकोणिसाव्या शतका-मध्ये सर्वप्रथम साजरा केला गेला. तेव्हापासून दरवर्षी १८ जून रोजीच हा दिवस साजरा करण्यात येत आहे. आंतरराष्ट्रीय सहल दिवस सगळ्यात प्रथम फ्रान्स देशात साजरा करण्यात आला होता. या दिवशी इथे राहणारे लोक निसर्गाचे सान्निध्य असलेल्या समुद्राकाठी एखाद्या शांत-निरव ठिकाणी जातात आणि आपल्या कुटुंबासोबत आनंदाने वेळ व्यक्तीत करतात. सोबतच चीज, ब्रेड, फ्रुटस तसेच वाईन इत्यादींचा आनंद देखील घेतात. अशा ठिकाणी मादक पदार्थांचे सेवन करून मौजमस्ती करणे टाळले पाहिजे. ही अवस्था प्राणघातक ठरू शकते. पिकनिक डे साजरा करणे हे फ्रान्स या देशात फ्रेंच राज्यक्रांतीचा शेवट झाल्यानंतर सुरू झाले. फ्रेंच राज्यक्रांती संपुष्टात आल्यानंतर पहिल्यांदाच येथील जनतेसाठी रॉयल नावाचे गार्डन सुरू करण्यात आले. त्यानंतर फ्रेंच देशातील लोक आपल्या फॅमिलीसोबत येऊन वेळ व्यतीत करू लागले. घरून स्वयंपाक तयार करुन गार्डनमध्ये जाऊन गप्पागोष्टी करत खाऊ- पिऊ लागले. तेव्हापासून ही तेथील प्रथाच बनून गेली. पण आता हाच दिवस फ्रान्स व्यतिरिक्त संपूर्ण जग देखील हळूहळू मान्य करू लागला आहे. म्हणूनच भारत देशात तसेच जगभरात दरवर्षी १८ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा केला जाऊ लागला आहे. इंटरनॅशनल पिकनिक डे हा मराठीत आंतरराष्ट्रीय पातळीवर साजरा केला जाणारा सहलीचा दिवस म्हणून संबोधिले जाते.

भारत देशात ज्ञानवर्धक जागतिक सहल दिनी पर्यटन सावधगिरीने पार पाडणेच इष्ट राहील. यानिमित्ताने गर्दी करणे टाळा, मास्कचा वापर करा, शारीरिक अंतर पाळा व वेळोवेळी हात सॅनिटायझर्ड करा !!

**-कृ. गो. निकोडे**
गडचिरोली,
मो. ९४२३७१४८८३

# कल्लाळ, भनगी, पिंपळगाव, मार्कंड आणि गंगाबेट येथे अवैध वाळू उपसा करणारी जवळपास सव्वा तीन कोटींची यंत्रसामुग्री जप्त

## एलसीबी, नांदेड ग्रामीण, सोनखेड आणि लिंबगाव पोलिसांची संयुक्त कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –तालुक्यातील कल्लाळ, भनगी, पिंपळगाव, मार्कंड आणि गंगाबेट येथील गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा होत असल्याची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड ग्रामीण, सोनखेड आणि लिंबगाव पोलिसांचा मोठा फौज फाटा महसूलच्या यंत्रेला सोबत घेऊन धडकला. या पथकांनी तब्बल सव्वा तीन कोटींची यंत्रसामुग्री जप्त केली. काही साहित्य जाग्यावरच ब्लास्ट करून उडवून दिले. यावेळी पोलिसांनी १६ जणांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे.

नांदेड तालुक्यात गोदावरी नदी पात्रामध्ये कल्लाळ, भनगी, पिंपळगाव, मार्कंड, गंगाबेट या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, नांदेड ग्रामीणचे ओमकांत चिंचोलकर, सोनखेडचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे आणि





सोनखेडचे पंढरीनाथ बोधनकर, एलसीबीचे एपीआय रवी वाहुळे, विठ्ठल घोगरे, वसंत मुळे, पीएसआय मिलिंद सोनकांबळे, साईनाथ पुयड, नागनाथ तुकडे, महेश कोरे, व्यंकट कुसमे यांनी आपापले पथक तयार करून वरिष्ठांच्या आदेशावरून वरील वाळूघाट गाठले. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळू उपसा यंत्राच्या साह्याने सुरू होता. पोलिसांनी सापळा रचून यंत्रसामुग्री जप्त केली. यात वाळू काढण्याचे १२ इंजिन, वाळू काढण्याच्या ११ बोटी, २३७ तराफे आणि ३२ ब्रास वाळू असा ३ कोटी २१ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिसांनी घटनास्थळावरून प्रसाद कळके, सचिन कळके दोघे रा. कल्लाळ, हॅपी शिलेदार, अमित हंबर्डे, अरुण लुटे रा. विष्णुपुरी, पवन येवले, मोहन येवले रा. मार्कंड, रमेश गच्चे, रघुनाथ मोरे, पवन मोरे, भागवत मोरे रा. भनगी, विकास डक रा. पिंपळगाव, मनोज क्षीरसागर रा. बोरगाव, विवेक राजू सोनटक्के रा. गंगाबेट, मोतीराम सोनटक्के, पुंडलिक सोनटक्के रा. वाहेगाव यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध पोलीस हवालदार विश्वनाथ पवार यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे..

# जिल्ह्यात ५४ केंद्रांवर ३० हजार परीक्षार्थी देणार टीईटी परीक्षा

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा; गैरप्रकार रोखण्यासाठी विशेष भरारी पथके तैनात

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने रविवार, दि. २८ जून रोजी होणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात जिल्हा प्रशासनाने व्यापक तयारी केली आहे. जिल्ह्यातील ५४ परीक्षा केंद्रांवर एकूण ३० हजार ७६ परीक्षार्थी परीक्षा देणार असून, त्यासाठी आवश्यक सर्व यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.



परीक्षेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. यावेळी परीक्षा केंद्रांवरील मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, गोपनीय साहित्याचे संरक्षण तसेच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

परीक्षा काळात कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार अथवा कॉपीचे प्रकार घडू नयेत यासाठी प्रत्येक केंद्रावर बैठे पथक नियुक्त करण्यात येणार आहे. तसेच जिल्हास्तरावर विशेष भरारी पथकांची नियुक्ती करून संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने नजर ठेवण्यात येणार आहे. परीक्षा केंद्र परिसरात कडक निर्बंध लागू करण्यात येणार असून, सर्व परीक्षार्थींनी वेळेपूर्वी केंद्रावर उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

परीक्षेचे वेळापत्रक– पेपर क्रमांक १ (इयत्ता पहिली ते पाचवी) प्राथमिक गटासाठी होणाऱ्या या परीक्षेसाठी १३ हजार १०५ परीक्षार्थी नोंदणीकृत आहेत. हा पेपर सकाळी १०.३० ते दुपारी १ या वेळेत होणार आहे.

पेपर क्रमांक २ (इयत्ता सहावी ते आठवी) उच्च प्राथमिक गटासाठी १६ हजार ९७१ परीक्षार्थी परीक्षा देणार असून, हा पेपर दुपारी २.३० ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग आणि शिक्षण विभागाच्या समन्वयातून परीक्षा शांततापूर्ण, पारदर्शक व गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

# ऑपरेशन यात्री सुरक्षा व ऑपरेशन अमानत अंतर्गत आरपीएफकडून चोरट्यांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षा, संरक्षा आणि सहाय्यासाठी रेल्वे सुरक्षा बल, नांदेड विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन यात्री सुरक्षा आणि ऑपरेशन अमानत अंतर्गत चोरीचे गुन्हे उघडकीस आणणे, आरोपींना अटक करणे तसेच हरवलेल्या मालमत्तेची यशस्वीपणे पुनर्प्राप्ती करण्यात उल्लेखनीय यश मिळाले आहे.

ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत आरपीएफ गुन्हे गुप्तवार्ता शाखा व गुप्तहेर विभाग, नांदेड तसेच शासकीय रेल्वे पोलीस नांदेड यांच्या संयुक्त पथकाने भारतीय न्याय संहिता कलम ३०५(सी) अंतर्गत नोंद असलेला गुन्हा क्रमांक ३८७/२०२६ यशस्वीरीत्या उघडकीस आणला.



या प्रकरणात गाडी क्रमांक १२४४० श्रीगंगानगर-हजूर साहिब नांदेड एक्स्प्रेसच्या बी-१ डब्यातून सुमारे ७० हजार किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने असलेली ट्रॉली बॅग चोरीस गेली होती. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संयुक्त पथकाने राजस्थान येथील रहिवासी आकाशदीप सिंग (वय २५ वर्षे) याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपीने दि. १३ जून २०२६ रोजी गाडी पूर्णा रेल्वे स्थानक ओलांडल्यानंतर चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीस न्यायालयात हजर करण्यात आले असता जेएमएफसी न्यायालय, नांदेड यांनी पोलीस कोठडी मंजूर केली. पुढील तपासादरम्यान चोरीस गेलेले सर्व दागिने जप्त करण्यात आले.

**दोन चैन स्नॅचर अटकेत**

ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत आणखी एका यशस्वी कारवाईत परतूर रेल्वे स्थानकावरील सतर्क आरपीएफ कर्मचाऱ्यांनी दोन संशयित चैन स्नॅचरना ताब्यात घेतले.

गाडी क्रमांक १७६१९ छत्रपती संभाजीनगर - हजूर साहिब नांदेड विशेष एक्स्प्रेस स्थानकातून सुटत असताना हे दोघे धावत्या गाडीतून उडी मारून पळून जाण्याचा प्रयत्न करताना आढळले. तत्काळ त्यांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान काकासाहेब पळसकर आणि सागर काकडे, दोघेही छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रहिवासी यांनी एका महिला प्रवाशाची सोन्याची चैन हिसकावून पळण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली. आरोपींकडून अंदाजे ३० ग्रॅम वजनाची व सुमारे ४.५० लाख किमतीची सोन्याची चैन हस्तगत करण्यात आली. यानंतर या घटनेबाबत रेलमदत तक्रार प्राप्त झाली.

तक्रारदार शुभांगी भवानी (वय ३१ वर्षे), निजामाबाद, तेलंगणा यांनी हस्तगत करण्यात आलेली चैन स्वतःची असल्याची ओळख पटवून दिली. त्यानंतर आरोपी व जप्त माल पुढील कायदेशीर कारवाईसाठी जीआरपी परतूर यांच्या ताब्यात देण्यात आला.

# एमजीएममध्ये इंग्लिश लँग्वेज क्लबतर्फे वादविवाद स्पर्धा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील इंग्लिश लँग्वेज क्लबतर्फे महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात नुकत्याच वादविवाद स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धेसाठी प्रोफेसर सत्पालसिंग गिल यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या वादविवाद स्पर्धेतून विद्यार्थ्यांचे संभाषण तसेच चिकित्सक विचार कौशल्य वाढविण्याचा उद्देश असल्याचे मत प्रस्ताविकात क्लबचे अध्यक्ष प्रा. डॉ. चंदनकुमार सोमवंशी यांनी सांगीतले. या स्पर्धेत एकूण ३६



विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

या स्पर्धेत प्रथम वर्ष अभियांत्रिकीची श्रद्धा मांडलीक विजेती तर कुमुदावली कुणीगलकर उपविजेती ठरली. कार्यक्रमास परीक्षक म्हणून प्रा. सत्पालसिंग गिल आणि प्रा. विजय कांबळे यांनी काम पाहिले. कार्यक्रमास ग्रंथपाल डॉ. गोविंद हंबर्डे, प्रा. मुरारी पावडे आणि प्रथम वर्ष प्रमुख प्रा. राहूल शर्मा आदींची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिद्धी आग्रवाल हिनी केले. या वादविवार स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

# मुखेडात दीड लाखाची घरफोडी; अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड शहरातील दीपनगर येथे अज्ञात चोरट्यांनी बंद घराचे कुलूप तोडून घरफोडी करत सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १ लाख ४२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना १४ ते १५ जूनच्या दरम्यान घडली.

मुखेडच्या दीपनगर येथील रहिवासी राजाराम तुळशीराम कदम यांच्या घरी ही चोरी दि. १४ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ते दि. १५ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजेपर्यंतच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी केली. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यावेळी घरातील सोन्या-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा एकूण १ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला.

# २१ जून रोजी पोलीस कवायत मैदानावर आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली, मानसिक स्वास्थ्य आणि शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश समाजात पोहोचविण्याच्या उद्देशाने यंदाही नांदेड जिल्ह्यात योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी ७ वाजता वजीराबाद येथील पोलीस कवायत मैदान येथे होणार आहे. जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग, जिल्हा योग संघटना आणि लोकमत समूह यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील नागरिक, विद्यार्थी, युवक, क्रीडापटू, योगप्रेमी, स्वयंसेवी संस्था तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होणार असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अपर जिल्हाधिकारी डॉ. रत्नदीप गायकवाड यांनी केले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतीच पूर्वतयारी आढावा बैठक पार पडली. या बैठकीत विविध विभागांच्या जबाबदाऱ्या निश्चित करून कार्यक्रमाचे नियोजन, सुविधा आणि समन्वय यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे, जिल्हा युवा अधिकारी श्रीमती कनकटे, क्रीडा अधिकारी बालाजी शिरसीकर, लोकमत समूहाच्या प्रतिनिधी सपना भागवत तसेच योग विद्या धामचे योगाचार्य, जिल्हा योग संघटनेचे प्रतिनिधी आणि जिल्ह्यात योगाचा प्रचार-प्रसार करणाऱ्या विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत बोलताना अपर जिल्हाधिकारी डॉ. गायकवाड यांनी सांगितले की, कार्यक्रमाचे आयोजन करताना सर्व संबंधित विभागांनी आपापसात समन्वय साधून सूक्ष्म नियोजन करावे. कार्यक्रमादरम्यान भारत निवडणूक आयोगाच्या लागू असलेल्या आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यात यावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# जिल्हा परिषद शाळा बाभुळगाव येथे तहसीलदार संजय वारकड यांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तके वाटप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– शाळेच्या पहिल्या दिवशी नांदेड तालुक्यातील बाभुळगाव येथील नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मान्यवरांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आली. यावेळी शाळा परिसरात रांगोळी काढून सुशोभीकरण करण्यात आले होते.

१५ जून रोजी जिल्हा परिषद शाळा् बाभुळगाव येथे शाळेच्या पहिल्या दिवशी पहिलीच्या वर्गतील विद्यार्थ्यांचे स्वागत व मोफत पाठ्यपुस्तके नांदेडचे तहसीलदार संजय वारकड, सरपंच तथा प्रशासक पुंडलिक पाटील मस्के, मंडळ अधिकारी संतोष असकुलकर, तलाठी योगीता अन्नमवार, मुख्याध्यापक सर्जे, शालेय समिती अध्यक्षा चित्रा मस्के, पोलीस पाटील संतोष मोरे, पोलीस पाटील आनंदा पवार, गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# 'राष्ट्रीय जलदिना'च्या मागणीबाबत सकारात्मक चर्चा व्हावी -अंजलीताई आंबेडकर

**नांदेड (प्रतिनिधी)** –२० मार्च १९२७ महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह हा 'राष्ट्रीय जल दिन' म्हणून घोषित करण्यात यावा, ही मागणी जोर धरत असतानाच याबाबत समाजामध्ये सकारात्मक चर्चा व्हावी, असे मत वंचित बहुजन आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या अंजलीताई आंबेडकर यांनी व्यक्त केले. नांदेड येथे आयोजित २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाकरीता त्या नांदेडला आल्या होत्या. यावेळी या मागणीचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर यांनी अंजलीताई आंबेडकर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे आपले म्हणणे मांडले.

महाड चवदार तळ्याच्या शताब्दी वर्षानिमित्त देशभरातील शाळा, महाविद्यालये व शासकीय कार्यालये या ठिकाणी प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित झाले पाहिजेत, शिवाय जनजागृतीसाठी केंद्र सरकारमार्फत प्रयत्न व्हायला हवेत. देशातील या क्रांतिकारी आंदोलनाचे स्मरण सदोदित रहावे याकरिता हा दिवस राष्ट्रीय जलदिन म्हणून घोषित करणे कितपत आवश्यक आहे याचे विश्लेषण



निवेदनात करण्यात आले आहे. दरम्यान, महेंद्र पिंपळगावकर यांनी सुरु केलेल्या या आंदोलनाचे अंजलीताई आंबेडकर यांनी कौतुक करत याबाबत सकारात्मक चर्चा व्हायला हवी असे प्रतिपादन केले.

दरम्यान २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनात देखील राष्ट्रीय जल दिनाच्या मागणीचा ठराव सर्व संमतीने मंजूर करण्यात आला.

# २० टक्के सेस योजनेतील लाभार्थी निवड प्रक्रियेला विलंब; अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्हा परिषद नांदेडच्या समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या २० टक्के सेस योजनेअंतर्गत मागासवर्गीय लाभार्थी निवड प्रक्रियेला गेल्या अनेक महिन्यांपासून विलंब होत आहे, असा आरोप स्वप्नील एस. गव्हाणे यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर केले. या निवेदनान्वये त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मागासवर्गीय लाभार्थ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी २० टक्के सेस योजनेअंतर्गत स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी प्रति लाभार्थी ४० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. यासाठी अर्ज मागवून अनेक महिने उलटले असले तरी अद्याप लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली नाही. ३१ मार्च २०२६ पर्यंत निधी खर्च करणे अपेक्षित असताना समाजकल्याण विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना यामुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, संबंधित विभागाकडून जाणीवपूर्वक दिरंगाई केली जात असल्याची भावना लाभार्थ्यांमध्ये निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनुदान वितरणातील विलंबाची सखोल चौकशी करून जबाबदार जिल्हा समाजकल्याण अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तत्काळ शिस्तभंगाची कारवाई करावी, तसेच प्रलंबित लाभार्थी निवड प्रक्रिया त्वरित पूर्ण करून लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे अनुदान वितरित करावे, अन्यथा जिल्हा परिषद कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशाराही स्वप्नील गव्हाणे यांनी दिला आहे.

# शैक्षणिक गुणवत्ता टिकविण्यासाठी विद्यार्थिनींनी अभ्यासात सातत्य टिकवणे गरजेचे -विभागीय सहनिबंधक संतोष बिडवई

**नवीन नांदेड(प्रतिनिधी)**– शैक्षणिक गुणवत्ता टिकविण्यासाठी विद्यार्थिनींनी अभ्यासात सातत्य ठेवून गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन विभागीय सहनिबंधक संतोष बिडवई यांनी केले.

टाकळगाव ग्रामपंचायतच्या वतीने गावातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. यवेळी संतोष बिडवई बोलत होते.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी टाकळगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने व ग्रामविकास अधिकारी जिल्हा परिषद लातूर अशोक लामदाडे यांच्या संकल्पनेतून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा



विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था- छत्रपती संभाजी नगरचे संतोष बिडवई यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्ष शंकर पाटील मोरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून धनंजय देशमुख (राज्यकर उपायुक्त, वस्तू व सेवाकर विभाग छत्रपती संभाजी नगर), गोविंद कल्याणपाड (जिल्हा बीज प्रमाणिकरण अधिकारी नांदेड), शंकर बलशेटवार (जिल्हा कृषी अधिकारी नांदेड), अरुण घुमनवाड (तंत्र अधिकारी जैविक कीड नियंत्रण विभाग नांदेड), सेवानिवृत्त मुख्याध्यापक नागोराव लोंढे, मुख्याध्यापिका श्रीमती महाजन, ज्येष्ठ नागरिक व्यंकट पाटील मोरे, गोविंदराव पाटील लामदाडे, चेअरमन शिवाजी पाटील मोरे, गोविंदराव देशमुख, माजी उपसरपंच उध्दव पुरी, पोलीस पाटील प्रताप पाटील मोरे, आदित्य पाटील लामदाडे, लक्ष्मण लामदाडे, बालाजी मोरे, ग्रामविकास अधिकारी अमृत शिंदे, माजी पोलीस पंढरी थेटे, माजी सरपंच शिवहार पाटील, अंगद पाटील थेटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गावातील दहावी व बारावीतील उत्तीर्ण विद्यार्थी, नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंतांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रास्ताविक सरपंच भीमराव लामदाडे, चेअरमन शिवाजी मोरे यांनी तर सूत्रसंचालन आनंद भोग यांनी केले.

# सायन्स कॉलेजच्या विद्यार्थिनीची समर रिसर्च फेलोशिपसाठी निवड



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील सायन्स कॉलेजच्या भौतिकशास्त्र विभागातील बी.एस्सी. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कांचन रत्नपारखे हिची इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमी आणि द नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रतिष्ठित समर रिसर्च फेलोशिप प्रोग्रामसाठी निवड झाली आहे.

या फेलोशिप अंतर्गत ती हरीशचंद्र रिसर्च इन्स्टिट्यूट, प्रयागराज येथे प्रा. आदिती सेन दे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन महिन्यांचे संशोधन कार्य करणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. लक्ष्मण शिंदे यांचे विद्यार्थ्यांना संशोधन क्षेत्रात पुढे जाण्यासाठी मिळणारे सातत्यपूर्ण प्रोत्साहन या यशामागे मोलाचे ठरले आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयातर्फे कांचन रत्नपारखे व तिच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य प्रा. डॉ. लक्ष्मण शिंदे, डॉ. डी. एम. जाधव, डॉ. विशाल मराठे, डॉ. अश्विन बोरीकर, डॉ. किरण शिल्लेवार, डॉ. उल्हास पत्की, डॉ. विजयकिरण नरवाडे, सुनील कदम व राहुल गवारे उपस्थित होते.

फॅशन | संसार | सौंदर्य
सखी

## प्रयत्न चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवण्याचा...

» सनस्क्रीन विसरू नका : वयानुसार चेहऱ्यावर वृद्धत्व दिसणे सामान्य गोष्टी आहे, परंतु अकाली दिसणारी चिन्हे कमी होऊ शकतात. यासाठी नेहमी चेहऱ्यावर एसपीएफ सनस्क्रीन लावण्याचा प्रयत्न करा. तुम्ही बाहेर असाल किंवा आत, ते नेहमी चेहऱ्यावर आणि इतर ठिकाणी लावणे फार महत्वाचे आहे. या गोष्टीमुळे चेहऱ्यावर सुरकुत्या, पिगमेंटेशन, सन टॅन अशा समस्या उद्भवण्याची समस्या कमी होते.

» ब्युटी रूटीनमध्ये व्हिटॅमिन सी समाविष्ट करा : अँटिऑक्सिडंट घटक त्वचेशी संबंधित अनेक समस्या दूर करण्यास मदत करतात. सुरकुत्या व्यतिरिक्त, ते सूज किंवा दुरुस्त करण्यास देखील मदत करतात. सकाळी व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असलेले उत्पादनांचा वापर करा यामुळे तुमची त्वचा चांगली राहण्यास मदत होईल.

» त्वचेतून ओलावा नाहीसा होऊ नये प्रयत्न करा : त्वचेला मॉइश्चरायझिंग ठेवा. ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. या गोष्टीमधून त्वचेवर होणारे नुकसान टाळता येते. त्यामुळे जास्ती जास्त पाणी प्या.

# पावसाच्या सरींमध्येही चमका आत्मविश्वासाने !



## मेकअप जास्त काळ कसा टिकवायचा?

**पावसाळ्यात वातावरणातील आर्द्रता वाढते आणि उष्णतेमुळे शरीराला जास्त घाम येतो. चिकट हवामानात कोणतेही उत्पादन त्वचेवर राहत नाही. मेकअपमुळेही चेहरा धुतला जातो. पावसाळ्यात मेकअप करणं अशक्य आहे असं नाही. पण, पावसाळ्यात काही खास मेकअप टिप्सच्या मदतीने तुम्ही मेकअप टिकाऊ शकता. तुम्हालाही चेहऱ्यावर बराच वेळ मेकअप कसा ठेवायचा हे जाणून घ्यायचे असेल तर या टीप्स नक्की फॉलो करा.**

» मेकअप करण्यापूर्वी बर्फ लावा : पावसाळ्यात त्वचेवर चिकटपणा येतो त्यामुळे मेकअप त्वचेवर राहत नाही. त्यामुळे मेकअप टिकवून ठेवण्यासाठी त्या पद्धतीने सर्वप्रथम आपली त्वचा तयार करणे आवश्यक आहे. मेकअप करण्यापूर्वी, बर्फाच्या तुकड्याने १५ मिनिटे आपल्या चेहऱ्याचे मसाज करा. असे केल्याने त्वचा थंड राहते आणि मेकअप केल्यानंतर बराच काळ टिकतो. चेहऱ्यावर जसा बर्फाचा तुकडा फिरवणार तसा मानेवर देखील फिरवा.

» प्राइमर वापरणे गरजेचे : पावसाळ्यात मेकअप टिकून राहण्यासाठी तुम्ही प्राइमर वापरू शकता. प्राइमर लावल्याने मेकअप बराच काळ चेहऱ्यावर टिकून राहतो. चेहऱ्यावर फाउंडेशन किंवा इतर मेकअप प्रोडक्ट लावण्यापूर्वी टी- झोनला थोडेसे प्राइमर लावा. बहुतेक लोकांना या भागात खूप घाम येतो. त्यामुळे त्या भागात प्राइमर लावणे फार गरजेचे आहे.

» पावडर फाउंडेशन लावा : पावसाळ्यात लिक्विड फाउंडेशन लावण्याऐवजी पावडर फाउंडेशन लावा. यामुळे त्वचेला चिकटपणा राहणार नाही. प्रथम सौम्य क्लींजरने चेहरा स्वच्छ करा. त्यानंतर त्वचेवर मॉइश्चरायझर लावा. त्यानंतर प्राइमर लावा. त्यानंतर ब्रशच्या मदतीने चेहरा आणि मानेवर पावडर फाउंडेशन लावा. पावडर फाउंडेशन घाम शोषून घेते आणि चेहरा कोरडा ठेवतो.

» काजळ, लाइनर पेन्सिल वापरा : आर्द्रतेमुळे चेहऱ्यावर जास्त घाम येतो आणि मस्करा किंवा लाइनर धुऊन जातो. ही समस्या टाळण्यासाठी तुम्ही काजळ पेन्सिल वापरा. काजळ पेन्सिलने तुम्ही लाइनर लावू शकता आणि आयब्रो देखील करू शकता. पावसाळ्यात काजळ पेन्सिल लावल्याने काही तासांनंतर त्याचा रंग हलका होईल. परंतु, आपण ते पुन्हा लागू करू शकता. पेन्सिल वापरून मस्करा घामाने निघून जाऊ शकत नाही. या सोप्या टिप्सच्या मदतीने तुम्ही तुमचा मेकअप टिकवून ठेऊ शकता आणि त्वचेला घाम आला तरी मेकअप खराब होणार नाही.

### कोणत्या प्रकारची लिपस्टिक लावायची?

पावसाळ्यात अशी लिपस्टिक लावावी जी जास्त काळ टिकते. तुम्ही लिक्विड मॅट लिपस्टिक लावू शकता. ही लिपस्टिक ओठांना सुंदर तर बनवतेच पण ओठांवर दीर्घकाळ टिकते. तुम्ही ऑफिसला जात असाल किंवा प्रवासात असाल तर पावडर मॅट लिपस्टिकही लावू शकता. पावसाळ्यात लिपस्टिकऐवजी लिप लायनरही वापरू शकता.

## तेलकटपणा नाहिसे करणारे 10 मार्ग...

**पावसाळ्यात हवेत ओलावा जास्त असतो. त्यामुळे चेहरा पुन्हा पुन्हा स्वच्छ करावा लागतो. याशिवाय पावसाळ्यात अनेक प्रकारचे संसर्ग पसरतात. त्यामुळे आजारांसोबतच त्वचेशी संबंधित समस्याही उद्भवतात. पावसाळ्याच्या दिवसात, त्वचेच्या छिद्रात घाण अडकणार नाहीत म्हणून दिवसातून दोन-तीन वेळा चेहरा धुणे गरजेचे असते. पण त्वचेची काळजी घेताना आपण छोट्या चुका करतो. या क्षुल्लक वाटणाऱ्या चुकांचा परिणाम त्वचेवर खोल होतो. म्हणूनच या काळात तुम्ही त्वचेची काळजी घेणं गरजेचं असते.**

1 पावसाळ्यात त्वचेची काळजी घेणं गरजेच असतं. या वेळी सौम्य क्लिंजर वापरावे. याशिवाय तुम्ही त्वचेला पपईदेखील लावू शकता.

2 जर तुमची त्वचा तेलकट असेल तर एक लहान चमचा पाण्यात लॅव्हेंडर तेल टाकून चेहऱ्याला लावा. यामुळे त्वचेला आराम मिळतो.

3 पावसाळ्यात तुम्ही रोज रात्री अँटी-बॅक्टेरियल टोनर लावून झोपावे. कारण ते त्वचेची पीएच पातळी योग्य ठेवते.

4 पावसाळ्यात बुरशीजन्य संसर्गाचा धोका खूप वाढतो. हे टाळण्यासाठी दिवसातून किमान दोन-तीन वेळा चेहरा धुवा. त्वचेला योग्य असेल असा फेसवॉश देखील लावू शकता.

5 शरीराला विषारी पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्या. जेणेकरून मुरुम आणि मुरुम बाहेर येणार नाहीत.

6 मेकअपमुळे सौंदर्यात भर पडत असली तरी त्यामुळे त्वचेची खोल छिद्रे बंद होतात. मेकअप काढण्यासाठी बदाम तेलाचा वापर करा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही खोबरेल तेल किंवा बेबी वाइप्सचा देखील वापरू शकता.

7 पावसाळ्यात त्वचेला एक्सफोलिएट करायला विसरू नका. यासाठी मध आणि साखरेचा स्क्रब वापरा. साखर मृत त्वचा काढून टाकून छिद्र बंद करण्यास मदत करते, तर मध त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि मऊ करते.

8 ग्रीन टी, लिंबू आणि काकडी यांसारखे नैसर्गिक टोनर वापरा. टोनिंगमुळे त्वचेतील काही घाणही निघून जाईल आणि त्वचा कोरडीही होणार नाही.

9 पावसात चेहऱ्याशिवाय पाय आणि हातांना सर्वाधिक संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे पावसात भिजण्याचा प्रयत्न करा. ओले झाल्यास थोडे कोमट पाणी घालून त्यात लिंबाचा रस घाला. त्यानंतर त्या पाण्यात पाय टाका. त्याच कोमट पाण्याने हात आणि हात धुवा.



10 रोज किमान ८ ग्लास पाणी प्या आणि सनस्क्रीन लावायला विसरू नका. पावसाळ्यात जरी सूर्य नसेल तरी सूर्यांच्या धोकादायक किरणांचा त्वचेवर वाईट परिणाम होतो. त्यामुळे सनस्क्रीन लावायला विसरू नका.



## चेहऱ्याला बदामाच्या तेलाचे हवे पोषण !

**बदामाचे तेल आरोग्यासाठी आणि त्वचेसाठी फायद्याचे असते. आयुर्वेदात बदामाच्या तेलाला फार महत्त्व देण्यात आले आहे. बदामाच्या तेलामध्ये असलेल्या पोषण द्रव्यांमुळे त्वचेवर वेगळी चमक येते. त्वचेचा पोत चांगला करण्यासाठी बदामाच्या तेलाचा वापर केला जातो. बदामाच्या तेलामध्ये व्हिटामीन ए, ई, डी , पोटॅशिअम, आयर्न, मॅंगनेशिअम, ओमेगा ३ फॅट्स असे पोषण द्रव्य असतात. यामुळे त्वचेचे आजार किंवा समस्या दूर करण्यास मदत होते. या तेलाच्या मदतीने आपण चेहऱ्यावर येणारे काळा डाग कमी करु शकतो. चला तर मग बदामच्या तेलाचे चेहऱ्याला होणारे फायदे जाणून घेऊयात...**

» या समस्या होतील दूर : जर तुम्ही चेहऱ्याला बदामाचे तेल लावणार असाल तर यामुळे डार्क सर्कल, सूर्याच्या किरणांमुळे होणारा त्रास. रिंकल्स, कोरडी त्वचा सुधारण्यास मदत होईल. त्याच प्रमाणे तुमच्या त्वचेचा पोत सुधारण्यास मदत होईल.

» बदामाच्या तेलाचा कशा प्रकारे वापर करावा : बदामाच्या तेलाचा वापर आपण अनेक प्रकारे करू शकतो. एसेंशियल तेलामध्ये किंवा मॉइस्चराइजर म्हणून वापरू शकता. रात्री झोपण्यापूर्वी बदामाच्या तेलाने मालिश केल्याने त्वचेला त्याचा फायदा होतो.

» त्वचेवर तेज आणण्यासाठी : तुमच्या त्वचेवर जर तुम्हाला नैसर्गिक तेज हवे असेल तर तुम्ही बदामाच्या तेलाचा वापर करणे गरजेचे आहे. बदामाचे तेल चेहऱ्याला लावल्यानंतर तुमच्या त्वचेचा पोत सुधारण्यास मदत होते.

» सुरकुत्या कमी करण्यासाठी : चेहऱ्यावरच्या सुरकुत्या कमी करण्यासाठी आपण बदामाच्या तेलाचा वापर करू शकतो. सुरकुत्या कमी करण्यासाठी बदामाचे तेल हा रामबाण उपाय आहे. एका वाटीमध्ये बदाम तेल, नारळ तेल आणि कोरफड जेल एकत्र घ्या आणि या मिश्रणाने चेहऱ्याचा मसाज करा. या उपायामुळे त्वचेचा कोरडेपणा कमी होतो आणि सुरकुत्या देखील कमी होतील.

## फ्रिझी हेअरची समस्या अशी करा दूर....

» असा निवडा शॅम्पू : केसांमध्ये कमी प्रमाणात शॅम्पू लावा. आठवड्यातून दोन वेळा केस धुवा. त्यामुळे केसांचा पोत सुधारण्यास मदत होईल. पण या काळात केस चांगल्या पद्धतीने वाळवा, ते ओले ठेवू नका.

» उशीचे कवर घेताना हा विचार करा : केसांचा फ्रिझीपणा कमी करण्यासाठी उशीचे कवर घेताना नक्की विचार करा. सिल्कच्या कपड्याचा वापर करा. त्यामुळे केसांचे नुकसान होत नाही. त्यामुळे केसांना त्रास होणार नाही.

» कंडीशनिंग : पावसाळ्यात केसांची जास्त काळजी घेणं गरजेच असते. त्यामुळे केसांना योग्य पद्धतीने कंडीशनिंग करा. त्यासाठी कोकोनट ऑईल वापर तुम्ही करू शकता.

» हेअर मास्क : या दिवसात तुम्ही केसांना हेअर मास्कदेखील लावू शकता. यासाठी मुलतानी माती आणि गुलाबपाणीचा वापर घरी हेअर पॅक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो. या पॅकमुळे टाळूतील तेल साफ करताना कोंडाही कमी होईल. यामुळे केस स्वच्छ दिसतील आणि स्वच्छ वाटतील. यासोबतच केसांवर हेअर प्रोडक्ट्सचा वापर कमी करा.

» असं सुकवा केस : ओले केस खूप नाजूक असतात. त्यामुळे केस सुकवताना मोठ्या कंगव्याचा वापर करा. त्यामुळे केसांचे गळणे कमी होईल. या दिवसात केस ओले ठेवू नका.

## कपाटातील कपड्यांना वास?

**पावसाळ्यात आर्द्रतेचं प्रमाण जास्त असल्यानं वस्तूंना ओलाव्यापासून जपावं लागतं. इतर वस्तूंप्रमाणे कपड्यांची काळजी घेणं देखील गरजेचं आहे. सध्या घराबाहेर पडण्याचं प्रमाण कमी असल्यानं कित्येक कपडे कपाटात धूळ खात पडले आहेत. या ऋतूत कपड्यांना कुबट वास येणे, हलका ओलसरपणा किंवा बुरशी येणं असे प्रकार घडतात. शिवाय चपलांवर देखील धूळ साचून त्या अस्वच्छ दिसत असतील. कमीत कमी वेळात कपाट आवरण्यासाठी काय करावं हा प्रश्न बऱ्याच लोकांसमोर आ वासून उभा राहतो. विशेषतः पावसाळ्यात कपाट आणि कपडे अपटूडेट राहण्यासाठी काय करता येईल, याविषयी...**



### या टिप्स अवलंबा...

- पावसाळ्यात कपाट व्यवस्थित लावताना काही महत्त्वाच्या गोष्टी कायम ध्यानात ठेवा. आधी कागद ठेवून मग त्यावर कपड्यांच्या घड्या ठेवण्याची सवय लावून घ्या.
- तुमच्या वॉर्डरोबमध्ये एका कोपऱ्यात मिठानं भरलेली पिशवी ठेवा. ही पिशवी केवळ ओलावाच शोषून घेत नाही तर कपडेदेखील कोरडे ठेवण्यास मदत करते.
- ओलावा शोषून घेण्यासाठी खडू ठेवू शकता.
- मलमल कापडाचा एक तुकडा घेऊन त्यात कापूर बांधून ते कपाटात ठेवा. शिवाय, कापरामुळे कपडे सुगंधित राहतील.
- कडुनिंबाच्या पानांना नैसर्गिक जंतुनाशक म्हणून आयुर्वेदात महत्त्व आहे. ओलाव्यामुळे बुरशी अथवा जंतूंचा फैलाव टाळण्यासाठी कपाटाच्या एका कोपऱ्यात कडुनिंबाची वाळलेली पानं ठेवा.
- वाळवी आणि तत्सम कीटकांचा उपद्रव टाळण्यासाठी कपाटात डांबर गोळ्या ठेवणं देखील उत्तम पर्याय ठरू शकतो.

### ओलावा नकोच!

कपाट बंदिस्त अस्वस्थेत असल्यानं आत हवा जाणं अशक्य असतं. अशा वेळी बुरशी किंवा जाळी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः पावसाळ्यात अगदी थोड्या ओलाव्यानं देखील बुरशीला आमंत्रण मिळू शकतं. कपाट भिंतीला चिकटून न ठेवता दोघांमध्ये योग्य अंतर असायला हवं असा सल्ला तज्ञ देतात. वापरात नसणाऱ्या कपड्यांना कपाटात वेगळी जागा करा. बाजारात व्हॅक्युम सील बॅग्स उपलब्ध असतात. त्यांचा वापर करा. वापरात नसणाऱ्या आणि महागड्या कपड्यांना या बॅग्समध्ये घालून होणारं नुकसान रोखू शकतात. कपाट वेळोवेळी स्वच्छ करत राहा. शिवाय कपडे कपाटात घडी करून ठेवण्याआधी पूर्णपणे कोरडे असण्याची खात्री करून घ्या. ओलावा असल्यास त्यांना सुकवा आणि मगच कपाटात ठेवा.

### बॅग्स, चपला

कपड्यांसोबतच चपला आणि बॅग्स यांची देखील वेळोवेळी स्वच्छता होणं महत्त्वाचं आहे. पावसाळ्यात बॅग्सना विशेष जपावं लागतं. तसंच बूटांकडे बऱ्याचदा दुर्लक्ष केलं जातं. तसं न करता बुटांना स्वच्छ ठेवा आणि ओलाव्यापासून दूर ठेवा. बूट स्वच्छ करण्यासाठी आणि चकचकीत ठेवण्यासाठी बाजारात वॅक्स पॉलिश आणि डस्टर ब्रश यांसारखे अनेक पर्याय उपलब्ध असतात. बूट स्वच्छ करून झाल्यानंतर त्यात सिलिका जेलचे पॅकेट्स ठेवा. यामुळे अतिरिक्त ओलावा शोषला जाईल. शिवाय, बुटांमधून दुर्गंधही येणार नाही. बुटांना प्लॅस्टिकच्या पिशवीत न ठेवता त्यांना सुती अथवा मलमलच्या स्वच्छ पिशवीत बांधून ठेवा.

## एथनिक साड्यांना द्या ट्रेंडी लूक



- साडीपासून बनवा सुंदर ड्रेस : जुन्या ठेवणीतील साड्यांना तुम्ही थोडा मॉडर्न लूक देऊ शकता. हल्ली साड्यांपासून ड्रेस तयार करण्याचा ट्रेंड आहे. साडीपासून तुम्ही अनारकली ड्रेस तयार करू शकता किंवा रोजच्या वापरासाठी कुर्तेदेखील तयार करू शकता. असे केल्याने जुन्या साड्यांना आपण नव्या प्रकारे वापरु शकतो. वेगवेगळी लटकन लावून किंवा धाग्यांचा वापर करुन तुम्ही ड्रेस बनवू शकतो.
- साडीपासून लेहेंगा : आज काल लग्नसराईचे दिवस सुरू आहेत. या दिवसांत तुमच्याकडे असणाऱ्या जुन्या साड्यांपासून तुम्ही लेहेंगा तयार करू शकता. लग्नामध्ये ब्राईट रंग वापरले जातात. त्यामुळे त्या रंगाच्या साडीचा लेहेंगा बनवला तर तुमचा लुक अजूनच छान वाटेल. पण साडीचा लेहेंगा शिवताना आधी साडीची लांबी नीट मापून घ्या. बऱ्याचदा काही साड्या कमी लांबीच्या असतात. त्यामुळे तुमच्या लेहेंग्याला कमी कापड असेल तर त्याचा संपूर्ण लूक निघून जाईल.
- साडीपासून गाऊन : साडीपासून तुम्ही गाऊन देखील बनवू शकता. पण हा गाऊन शक्यतो पैठणी किंवा खणाच्या साडीचा बनवावा. यामुळे तुमचा लूक अजूनच उठून दिसेल. या साडीवर तुम्ही पारंपरिक दागिने घालू शकता. हा लूक तुम्हाला रिच रॉयल लूक देईल.
- साडीपासून दुपट्टा : साडीपासून तुम्ही सुंदर दुपट्टा देखील तयार करू शकता. प्लेन कुर्तावर तुम्ही साडीपासून बनवलेली दुपट्टा घेऊ शकता. साध्या कुर्तावर ही ओढणी घेतल्याना तुम्हाला एलिगेंट लूक मिळू शकतो.
- साडीपासून जॅकेट : साड्यांचे टेक्स्चर जरा जाडसर असते. त्यामुळे या साड्यांचा उपयोग तुम्ही जॅकेट तयार करण्यासाठी करु शकता. कुर्त्याऐवजी तुम्ही एखादा पायघोळ वनपीस आणि त्यावर हे जॅकेट असा युनिक लूकही करू शकता. यामुळे तुम्ही इतरांपेक्षा वेगळे दिसू शकता.

## एल निनोच्या प्रभावामुळे पाणीटंचाईचे सावट; धरणसाठा घटला, शासन यंत्रणा सतर्क

मुंबई (प्रतिनिधी) - एल निनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सूनवर परिणाम होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी आधीच वर्तवली होती आणि गेल्या काही दिवसांतील आकडेवारी पाहता ही भीती आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये कमी पर्जन्यमान, भूजल पातळीत घट आणि धरणांतील पाणीसाठा झपाट्याने आटत चालल्याचे चित्र समोर येत आहे. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने राज्यातील जलस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत तातडीच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत.

भारतीय हवामान विभागाने २०२६ च्या मान्सून हंगामासाठी जाहीर केलेल्या पहिल्या दीर्घकालीन अंदाजात देशभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. जून ते सप्टेंबर या मॉन्सून हंगामात पॅसिफिक महासागराच्या पृष्ठभागाचे तापमान सरासरीपेक्षा वाढून एल निनो स्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याचे हवामान खात्याने स्पष्ट केले आहे. खासगी हवामान संस्था स्कायमेटनेही याला दुजोरा देत जून ते सप्टेंबर या काळातील एकूण पर्जन्यमान सरासरीच्या जेमतेम ९४ टक्क्यांच्या आसपास राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

## डी लिमिटेशन विधेयकासाठीच फोडाफोडी; माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची टीका



**सातारा (प्रतिनिधी)** -राज्यात सुरू असलेल्या खासदारांच्या फोडाफोडीच्या ऑपरेशन टायगरवरुन राजकीय वर्तुळात भूकंप झाल्याचं दिसून येत आहे. त्यावरुन, राजकीय नेते प्रतिक्रिया देत आहेत, सत्ताधारी शिवसेना पक्षाच्या नेत्यांकडून समर्थन केलं जात असून विरोधी पक्षाने टीका केल्याचं दिसून येत आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना लोकशाही संपुष्टात येत असल्याचं म्हटलं. आता, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनीही पक्ष फोडाफोडी आणि शिवसेना उबाठा पक्षातील ६ खासदारांच्या स्वतंत्र गट स्थापनेवर भाष्य केलं आहे. देशात एकाच व्यक्तीची हुकूमशाही आणण्याचा प्रयत्न सुरू असून लोकशाहीसाठी हा काळा दिवस असल्याची टीकाही त्यांनी केली.

कराडमध्ये माध्यमांशी बोलताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपवर विरोधी पक्ष फोडण्याचा आरोप केला आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गटातील सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र दिल्याने पक्षात फूट पडल्याच्या चर्चा सुरू असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तसेच केंद्र सरकार 'डी लिमिटेशन' (मतदारसंघ पुनर्रचना) विधेयकाच्या माध्यमातून उत्तर भारतीय राज्यांचे वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. महिला आरक्षणाच्या नावाखाली संविधान बदलण्याचा प्रयत्न सुरू असल्याचंही चव्हाण यांनी म्हटलं आहे.

देशात एकाच व्यक्तीची हुकूमशाही आणण्याचा प्रयत्न सुरू असून लोकशाहीसाठी हा काळा दिवस असल्याची टीकाही त्यांनी केली. लोटस, टायगर, लायन ती काय मला जनावरांची नावं माहिती नाहीत, पण शिवसेना उद्धव ठाकरे गटात विभाजन झाल्याच्या बातम्या येत आहेत. शिवसेनेच्या नऊपैकी सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र दिलं आहे. त्यामुळे पक्षात फूट पडलेली दिसत आहे. नरेंद्र मोदी डी लिमिटेशन विधेयकात बदल करून उत्तर भारतीय राज्यांचं वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

## अफगाणिस्तानला हरवून टीम इंडिया-ए फायनलमध्ये

कोलंबो (वृत्तसंस्था) - श्रीलंकेत खेळल्या जाणाऱ्या तिरंगा एकदिवसीय मालिकेत इंडिया-ए संघाने तुफानी कामगिरीच्या जोरावर फायनलमध्ये धडक मारली. मालिकेतील पाचव्या सामन्यात इंडिया-ए संघाने अफगाणिस्तान-ए चा तब्बल १०१ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. दांबुला येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारतीय संघाने केवळ आपल्या मागील पराभवाचा बदलाच घेतला नाही, तर ४ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.

या सामन्यात अफगाणिस्तानने टॉस जिंकून भारताला आधी फलंदाजीसाठी आमंत्रित केले. इंडिया-ए ची सुरुवात अत्यंत वादळी झाली. युवा सलामीवीर प्रियांश आर्यने ५८ धावा आणि वैभव सूर्यवंशीने ३८ धावा करत पहिल्या विकेटसाठी अवघ्या ८ षटकांत ७५ धावांची तुफानी भागीदारी केली. प्रियांशने आपल्या खेळीत ९ चौकार आणि १ षटकार ठोकला. सलामीवीर बाद झाल्यानंतर कर्णधार तिलक वर्मा आणि यष्टिरक्षक फलंदाज कुमार कुशाग्र यांनी डावाची सूत्रे हाती घेतली. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी १०४ धावांची शतकीय भागीदारी रचली. तिलक वर्माने ५९ धावा तर कुमार कुशाग्रने ५८ धावांचे योगदान दिले.

## भारतावर हल्ला झाला तर अमेरिकेशी गाठ, ट्रम्प यांनी सर्वांसमोर मोदींना दिला मदतीचा शब्द



**पॅरिस (वृत्तसंस्था)** - फ्रान्समध्ये झालेल्या भेटीदरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताबाबत मोठे वक्तव्य केले. भारतावर हल्ला झाल्यास अमेरिका भारताच्या मदतीसाठी उभी राहील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत पत्रकारांशी संवाद साधताना ट्रम्प यांनी हे विधान केले. जर भारतावर हल्ला झाला आणि नरेंद्र मोदी नेतृत्व करत असतील, तर आम्ही निश्चितपणे भारताच्या मदतीसाठी उभे राहू, असे ट्रम्प म्हणाले.

पश्चिम आशियातील अमेरिकन लष्करी कारवाईत तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ट्रम्प म्हणाले, हा अत्यंत कठीण व्यवसाय आहे. आम्ही या विषयावर एकत्रितपणे काम करत आहोत. आम्हाला त्या सर्वांबद्दल प्रेम आणि आदर आहे. ट्रम्प यांनी २०२० मधील आपल्या भारत दौऱ्याची आठवणही सांगितली. त्यांनी अहमदाबादमधील 'नमस्ते ट्रम्प' कार्यक्रमाचा उल्लेख करत त्या कार्यक्रमाचे विशेष कौतुक केले. भारताचा माझा मागील दौरा खूपच उत्कृष्ट होता. आम्ही त्या नव्या स्टेडियमचे उद्घाटन केले होते. मला वाटते आतमध्ये सुमारे १.५ लाख लोक बसू शकत होते. त्यावेळी स्टेडियमच्या बाहेरही सुमारे अडीच लाख लोक होते आणि मैदानावरही जवळपास एक लाख लोक उपस्थित होते. कदाचित तो विक्रम आजही मोडला गेला नसेल. भारतात मला खूप चांगला अनुभव आला, असे ट्रम्प म्हणाले.

## टी.सी. हरवली

माझी सय्यद खासीम सय्यद मोहम्म्द या नावाची दहावी पासची टी.सी. आसरा नगर ते चैतन्यनगर ऑटो प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क मोबाईल**
**सय्यद खासीम सय्यद मोहम्मद**
**रा. आसरानगर, नांदेड**

### जाहिरप्रगटन

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११६/२०२६

**शिवकुमार व ईतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. शिवकुमार पि. राजेश्वर सरोदे,
वय-४० वर्षे, रा. वंजार गल्ली कुंडलवाडी ता. बिलाली जि. नांदेड
हा. मु. रा. घर क्र. ६-२२-८३० राजीव नगर कॉलनी
डुब्बा जवळ सुभाष नगर निझामाबाद (तेलंगणा)
२. कृष्ण कुमार पि. राजेश्वर सरोदे वय-३८ वर्षे,
रा. वंजार गल्ली कुंडलवाडी ता. बिलाली जि. नांदेड
हा. मु. रा. घर क्र. ६-२२-८३० राजीव नगर कॉलनी
डुब्बा जवळ सुभाष नगर निझामाबाद (तेलंगणा)

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, **मयत व्यंकट रामचंद्र सरोदे** यांचे अर्जदार क्र.१ व क्र. २ हे पुतने आहेत. अर्जदार हे रा. वंजार गल्ली कुंडलवाडी ता. बिलाली जि. नांदेड हा. मु. रा. घर क्र. ६-२२-८३० राजीव नगर कॉलनी डुब्बा जवळ सुभाष नगर निझामाबाद (तेलंगणा) येथील रहिवाशी आहेत. मयत **व्यंकट रामचंद्र सरोदे** यांचा मृत्यु **दिनांक १९/०३/२०२६** रोजी झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **व्यंकट रामचंद्र सरोदे** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक ०३/०८/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. १२ जुन, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

### जाहीर प्रगटन

याव्दारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार कु. जवेरीया अंजुम मोहमद अफजल रा. आनंद नगर देगलूर येथील असून त्यांनी या कार्यालयात त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

१. जन्म झालेल्याचे नाव - कु. जवेरीया अंजुम मोहमद अफजल सदर व्यक्तीचा देगलूर या ठिकाणी दिनांक १०.०८.२००४ या दिवशी जन्म झाला आहे.

सदर व्यक्तीचा जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणकरीता दिनांक १८.०३.२०२६ रोजी तहसिल कार्यालय देगलूर येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांक, स्थळ व व्यक्तीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय देगलूर येथे सादर करावा दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

निवासी नायब तहसीलदार
महसूल-१ देगलूर

### जाहीर प्रगटन

याव्दारे प्रगटन देण्यात येते की, अर्जदार कु. मोहम्मद मुजम्मील मोहम्मद अफजल रा. आनंद नगर देगलूर येथील असून त्यांनी या कार्यालयात त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

१. जन्म झालेल्याचे नाव - कु. मोहम्मद मुजम्मील मोहम्मद अफजल सदर व्यक्तीचा देगलूर या ठिकाणी दिनांक २०.१२.२००१ या दिवशी जन्म झाला आहे.

सदर व्यक्तीचा जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणकरीता दिनांक १८.०३.२०२६ रोजी तहसिल कार्यालय देगलूर येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांक, स्थळ व व्यक्तीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिष्ट झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तह्सिल कार्यालय देगलूर येथे सादर करावा दिलेल्या मुटतीनतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही

निवासी नायब तहसीलदार
महसूल-१ देगलूर

## Change In Name

My Old Name is **KAUSER SULTANA.** Now I am Changing as a New Name **KAUSAR SULTANA.** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name please kindly consider the same.

FULL ADDRESS - H.NO.19/113, LABOUR COLONY POST SHIVAJI NAGAR NANDED MS 431602.
MOB.NO.9545060707

## Change In Name

My Old Name is **AFROZ BEGUM KAZEMUDDIN INAMDAR** which now I am Changing as New Name **AFROZ BEGUM MIR AFROZ ALI** Hence forth my all correspondence will be done as per my New Name. Please consider the same.

Address - H.No. NEAR AKBAR FUNCTION HALL PLOT No. 30 MOSIN COLONY NANDED Mo. No: 9075501737

### जाहीर प्रगटन

**मा. जिल्हा न्यायाधीश-१, बिलोली यांच्या न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक १७ /२०२६**

**वनश्री व्यंकट शंकरवार वि. निल**

ज्याअर्थी अर्जदार कुमारी वनश्री व्यंकट शंकरवार वय-१५ वर्ष व्यवसाय-शिक्षण, मार्फत अज्ञान पालनकर्ती आई ललीता व्यंकट शंकरवार वय ४० वर्षे, धंदा-घरकाम रा. करखेली ता. धर्माबाद जि. नांदेड यांनी या न्यायालयात कलम ८ हिंदु मायनॉरीटी ॲंड गार्डीयनशीप ॲक्ट अंतर्गत करखेली ता. धर्माबाद जि. नांदेड येथील जमीन गट नं. ५०८ मधील क्षेत्रफळ १ हे. ०० आर ही जमीन विकण्या करिता या न्यायालयात परवानगी मागीतली आहे.

सदरील मालमत्तेबाबत कोणाचा व कसलाही उजर अथवा आक्षेप असल्यास दिनांक ३०/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वत: जातीने किंवा वकीलामार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याव्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त दिवशी म्हणजेच दिनांक ३०/०६/२०२६ रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक २६/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

**अधिक्षक,**
जिल्हा न्यायालय,१ बिलोली

### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ,ता. बिलोली यांचे कार्यालय

**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.**

अर्ज/आवक क्र.3456/2025

**!! जाहीर प्रगटन !!**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार **सय्यद अमीर अहेमद, वय 25 धंदा-शिक्षण रा. का-हाळ** ता.बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मुत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा 2023 मधिल कलम 11(2) व (3) अन्वये दि.13/08/2025 रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार **सय्यद अमीर अहेमद**, रा. का-हाळ ता. बिलोली यांचा जन्म दि.10/06/2000 रोजीची नोंद ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हज्जापुर- का-हाळ ता. बिलोली जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, **सय्यद अमीर अहेमद**, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन **पंधरा दिवसात** या न्यायालयात स्वत: किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक 20/03/2026 रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

### तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बिलोली ,ता. बिलोली यांचे कार्यालय

**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत.**

अर्ज/आवक क्र.3456/2025

**!! जाहीर प्रगटन !!**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार **अब्दुल अहमद सय्यद, वय 21 धंदा-नोकरी रा. का-हाळ** ता.बिलोली यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म मुत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा 2023 मधिल कलम 11(2) व (3) अन्वये दि.13/08/2025 रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

अर्जदार **अब्दुल अहमद सय्यद**, रा. का-हाळ ता. बिलोली यांचा जन्म दि.16/04/2004 रोजीची नोंद ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय हज्जापुर- का-हाळ ता. बिलोली जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, **अब्दुल अहमद सय्यद**, यांच्या जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन **पंधरा दिवसात** या न्यायालयात स्वत: किंवा वकीला मार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक 20/03/2026 रोजी माझ्या सहीनिशी व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यात येत आहे.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**बिलोली**

### जाहीर प्रगटन

या द्वारे जाहीर प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री म. करीमोद्दीन म. मुनिरोद्दीन काजी रा. हणेगाव ता. देगलूर येथील असून त्यांनी या कार्यालयात त्यांचे स्वतःचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरिता मागणी केली आहे.

१. जन्म झाल्याचे नाव- श्री म. करीमोद्दीन म. मुनिरोद्दीन काजी सदर व्यक्तीचा हणेगाव या ठिकाणी दि. ०७.०५. १९७४ या रोजी जन्म झाला आहे.

सदर व्यक्तीचा जन्म प्रमाणपत्र मिळणे करिता आदेश होणे करिता दि. १५. १२. २०२५ रोजी तहसील कार्यालय देगलूर येथे अर्ज सादर केला आहे. वरील जन्म ,दिनांक, स्थळ व व्यक्ती बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसील कार्यालय देगलूर येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

निवासी नायब तहसीलदार महसूल- १ देगलूर

### जाहीर प्रगटन

या द्वारे जाहीर प्रगटन देण्यात येते की, अर्जदार श्री म. करीममोद्दीन म. मुनिरोद्दीन काजी रा. हणेगाव ता. देगलूर येथील असून त्यांनी या कार्यालयात त्यांचे बहिणीचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरिता मागणी केली आहे.

१. जन्म झाल्याचे नाव- कु. असिमाबेगम मुनिरोद्दीन काझी सदर व्यक्तीचा हणेगाव या ठिकाणी दि. ०५.०६. १९६६ या रोजी जन्म झाला आहे.

सदर व्यक्तीचा जन्म प्रमाणपत्र मिळणे करिता आदेश होणे करिता दि. १५. १२. २०२५ रोजी तहसील कार्यालय देगलूर येथे अर्ज सादर केला आहे. वरील जन्म ,दिनांक, स्थळ व व्यक्ती बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसील कार्यालय देगलूर येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

निवासी नायब तहसीलदार महसूल- १ देगलूर

**श्री सत्य शिक्षण क्रांतीकारक गुरू विठ्ठलदास भक्त संत तुकाराम शिक्षण प्रसारक मंडळ मंगल सांगवी संचलित,**

## सौ. राजाबाई मुलींचे वसतिगृह, गोपाळचावडी

## संत श्रीमती सोन्याबाई कन्या मुलींचे वसतिगृह गोपाळचावडी ता.जि. नांदेड प्रवेश देणे चालू आहे...

शासन मान्य अनुदानित वसतिगृहात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये खालील प्रवर्गानुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसुचीत जाती (एस.सी) | ६७ टक्के |
| २ | अनुसुचित जमाती (एस.टी) | १४ टक्के |
| ३ | भटक्या विमुक्त जमाती (व्ही. जे.एन.टी.) | १७ टक्के |
| ४ | विशेष मागासप्रवर्ग (एस.बी.सी.) | २ टक्के |
| ५ | इतर मागासवर्ग (ओ.बी.सी.) | १५ टक्के |
| ६ | बिगर मागासवर्ग (ओपन) | ५ टक्के |

नोट - १) भव्य व सुसज्ज इमारत, २) निवास व जेवणाची उत्तम सोय, ३) पिण्याचे फिल्टर पाणी, ४) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे लक्ष, अभ्यासाचे वेळापत्रक.

**अध्यक्ष** **अधिक्षीका**
**सौ. राजाबाई मुलींचे वसतिगृह, गोपाळचावडी**
**संत श्रीमती सोन्याबाई कन्या मुलींचे वसतिगृह गोपाळचावडी ता.जि. नांदेड**

### जाहीर प्रगटन

दिवाणी न्यायालय व.स्तर, भोकर, ता. भोकर, जि. नांदेड यांच्या न्यायालयात

दिवाणी किरकोल अर्ज क्रमांक २८/२०२६

स्वरांगी भ्र. विष्णु वाकदकर उर्फ मिनाताई पि. संभाजी खंदारे वि. उपविभागीय जलसंधारण अधिकारी व इतर,

अर्जदार:-
स्वरांगी भ्र. विष्णु वाकदकर उर्फ
मिनाताई पि. संभाजी खंदारे,
वय ३० वर्षे, धंदा घरकाम,
रा. वाकद, ता. भोकर, जि. नांदेड

**विरुध्द**

गैरअर्जदार :-
१. उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
लघु पाटबंधारे उपविभाग कळंब,
बार्शी रोड विश्राम कार्यालय क्षेत्र,
कळंब, ता. कळंब जि. धाराशिव,
(जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत)
२. सौ. सुमनबाई भ्र. रामजी वाकदकर,
वय ६० वर्षे, धंदा घरकाम,
रा. वाकद, ता. भोकर, जि. नांदेड.

दावा:- कलम ३७२ भारतीय वारसा अधिनियम १९२५ प्रमाणे अर्जदार यांना **विष्णु पि. रामजी वाकदकर,** यांचे वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) व गैरअर्जदार क्र. १ मधील मयताचे PRAN No. ११०११७१२७७३७ मधील रक्कम **रु. ९,६७,२१४.५७/-** व्याजासह मिळणे बाबत अर्ज.

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती व गैरअर्जदार क्र. २ यांचा मुलगा मयत नामे **विष्णु पि. रामजी वाकदकर,** यांचा मृत्यू दिनांक ०३/०८/२०२३ रोजी मौजे वाकद ता. भोकर, जि. नांदेड येथे झाला असून त्यांच्या मृत्यूपत्राआधारे वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) व गैरअर्जदार क्र. १ मधील मयत **विष्णु पि. रामजी वाकदकर** यांचे PRAN खाते क्र. ११०११७१२७७३७ मधील रक्कम **रु. ९,६७,२१४.५७/-** व्याजासह मिळण्याकरिता अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. बी.एम. शिरफुले, यांच्यामार्फत अर्ज दाखल केला आहे.

सदर अर्जदार यांच्या नावे मयतांचे मृत्यूपत्राआधारे वारसा प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळण्याकरिता जर कोणाचा आक्षेप/उजर असल्यास त्यांनी सदर जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर, जि. नांदेड येथे आपण स्वतः, वकिलामार्फत हजर राहून लेखी स्वरूपात आपले म्हणणे /आक्षेप नोंदवावे, अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

वरिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय व.स्तर
भोकर.

अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,
भोकर.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## Change In Name

My old Name is **ATIKHUNNISA** Which now I am Changing as New Name **ATIQUNNISA.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

Address: H.NO.801, NOMANIYA NAGAR, NEAR SANA HIGH SCHOOL, TARODA BK, NANDED-431605 Mob: 9421850987

## Change In Name

My old Name is **SHAIKH SALIMUDDIN** Which now I am Changing as New Name **SHAIKH SALEEMUDDIN** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name.

Address: H.NO.801, NOMANIYA NAGAR, NEAR SANA HIGH SCHOOL, TARODA BK, NANDED-431605
Mob: 9421850987

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ७७६७७७१७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व प्रादेशिक व्यवस्थापक यांच्या उपस्थितीत आरसेटी नांदेडमध्ये प्रेरणादायी दिवस




**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी काल भारतीय स्टेट बँक आरसेटी नांदेड येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी ज्युनिअर ब्युटी प्रॅक्टिशनर प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रशिक्षणार्थींशी संवाद साधून त्यांचे अनुभव जाणून घेतले. तसेच त्यांना मार्गदर्शन केले.

या भेटीदरम्यान त्यांनी भारतीय स्टेट बँक आरसेटी परिसराची पाहणी करून संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कौशल्य विकास व स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती घेतली. प्रशिक्षणार्थींना उद्देशून बोलताना त्यांनी कौशल्य, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर यशस्वी उद्योजक बनण्याचे आवाहन केले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी भारतीय स्टेट बँक आरसेटी, नांदेडच्या कार्याचे विशेष कौतुक करत ग्रामीण बेरोजगार युवक-युवतींच्या जीवनात सकारात्मक व समर्थक बदल घडवून आणण्यासाठी तसेच त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी संस्थेने भविष्यातही अधिक जोमाने कार्य करत राहावे, अशा शुभेच्छा दिल्या. याच दिवशी ज्युनिअर ब्युटी प्रॅक्टिशनर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या बॅच क्र. ३९६ व ३९७ चा उद्‌घाटन सोहळाही उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रादेशिक व्यवसाय कार्यालय, भारतीय स्टेट बँक, नांदेडचे प्रादेशिक व्यवस्थापक श्रीकांत पागल यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. त्यांच्या हस्ते तसेच बाबुराव सोनकांबळे (जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, नांदेड), राजीव राऊत (मुख्य व्यवस्थापक, क्षेत्रीय कार्यालय, स्टेट बँक, नांदेड, दिनेश खडसे प्रादेशिक व्यवस्थापक, कैलास जयभाये (संचालक, भारतीय स्टेट बँक आरसेटी,नांदेड), आशिष राऊत व निकिता तांबुळे, प्रशिक्षक, भारतीय स्टेट बँक आरसेटी, नांदेड यांच्या उपस्थितीत ७० प्रशिक्षणार्थींच्या बॅचचे उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी सर्व मान्यवरांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करत कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेचे महत्त्व अधोरेखित केले. स्वतःच्या पायावर उभे राहून यशस्वी उद्योजक बनण्यासाठी आत्मविश्वास, सातत्य आणि कठोर परिश्रमांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास भारतीय स्टेट बँक आरसेटी, नांदेडचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानचे वाङ्‌मय पुरस्कार जाहीर

### गिरीश कुबेर, अजीम नवाज राही, संगीता अरबुने आणि डॉ. प्र. दि. जोशी पाटोदेकर आदी पुरस्कारांचे मानकरी



**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या २०२४-२५ ह्या वर्षीच्या (रौप्यमहोत्सवी वर्ष) वाङ्‌मय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक गिरीश कुबेर, कवी अजीज नवाज राही, संगीता अरबुने आणि नांदेड येथील डॉ. प्र. दि. जोशी पाटोदेकर यांचा ह्या पुरस्कारांच्या मानकऱ्यांमध्ये समावेश आहे.

दरवर्षी एका ज्येष्ठ लेखकाला मातोश्री पद्मिनीबाई बन साधना सन्मानाने गौरविण्यात येते. यंदाच्या साधना सन्मानासाठी मुंबई येथील लोकसत्तेचे संपादक, ज्येष्ठ पत्रकार आणि साहित्यिक गिरीश कुबेर यांची निवड करण्यात आली आहे. रु. २१,००० रोख, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे ह्या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सर्वोत्कृष्ट पुस्तकाकरिता देण्यात येणाऱ्या प्रसाद बन वाङ्‌मय पुरस्कारासाठी बुलडाणा जिल्ह्यातील साखरखेर्डा येथील कवी अजीम नवाज राही यांच्या 'वळिवाच्या वेळा' (प्रकाशक : अथर्व, धुळे) या कवितासंग्रहाची निवड करण्यात आली आहे. रु.११,००० रोख, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे ह्या पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रसाद बन ग्रंथगौरव (राज्यस्तरीय) पुरस्कारासाठी वसई जि. पालघर येथील लेखिका संगीता अरबुने यांच्या 'एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी' (प्रकाशक : शब्दालय, श्रीरामपूर) ह्या ललितलेखसंग्रहाची निवड करण्यात आली आहे. रु. ५००० रोख, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

दुसरा ग्रंथगौरव पुरस्कार नांदेड जिल्ह्यातील साहित्यिकाला देण्यात येतो. डॉ. प्र. दि. जोशी पाटोदेकर यांच्या 'हे बंध समाजनिष्ठेचे' (प्रकाशक : इसाप, नांदेड) ह्या आत्मकथनाची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. रु. ५००० रोख, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे ह्या पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अच्युत बन, वाङ्‌मय पुरस्कार समितीचे निमंत्रक डॉ. सुरेश सावंत आणि संयोजक पत्रकार संजीव कुळकर्णी यांनी नांदेड येथे ह्या पुरस्कारांची घोषणा केली. प्रतिष्ठानच्या वाङ्.मय पुरस्कारांचे हे २५ वे वर्ष आहे. रविवार, दि. १२ जुलै रोजी नांदेड येथे एका विशेष समारंभात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

## शाश्वत भुयारेची पुणे येथे चमकदार कामगिरी

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचा १४ वर्षांखालील वयोगटातील खेळाडू शाश्वत सदाशिव भुयारे हा पुणे येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनसाठी १४ वर्षाखालील वयोगटातील निवड चाचणी सामन्यात इन्फिनिटी क्रिकेट ग्राउंड मावळ पुणे येथे चमकदार कामगिरी केली आहे.



पारसी जिमखाना पुणे 'ब' या संघाकडून खेळताना पहिल्या डावात ९१ चेंडूचा सामना करताना ७ चौकार लगावत नाबाद ५२ धावांची निर्णायक खेळी केली. तर दुसऱ्या डावात ३६ चेंडूचा सामना करताना ३ चौकार लगावत २० धावांची निर्णायक खेळी केली. त्यामुळे पारसी जिमखाना ब या संघाने पारसी जिमखाना अ या संघावर निर्णायक विजय मिळवला.

शाश्वत भुयारे याच्या यशाबद्दल मराठवाडा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. सदाशिव रा. भुयारे, मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचे संचालक माधव भुयारे, मोनिका लेडीज फिटनेस क्लबच्या संचालिका मोनिका नांदेडकर, मराठवाडा क्रिकेट अकॅडमीचे सर्व प्रशिक्षक व व्यवस्थापकीय टीम आणि किड्स किंग्डम पब्लिक स्कूल/ श्री चैतन्य टेक्नो स्कूल खुरगाव या शाळेच्या प्राचार्य आणि शाळेतील सर्व स्टाफ मेंबर्सने शाश्वत भुयारे यांचे अभिनंदन केले.

## श्री क्षेत्र येवती येथील मठाधिपती नराशाम महाराज येवतीकर यांचा वाढदिवस साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड तालुक्यातील श्री क्षेत्र येवती (लघु आळंदी) येथील जागृत देवस्थान नराशाम महाराज मठ संस्थानचे मठाधिपती नराशाम महाराज यांचा ४७ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

नराशाम महाराज यांना शुभेच्छा देण्यासाठी व आशीर्वाद घेण्यासाठी अनेक भाविकांनी एकच गर्दी केली होती. मुखेड तालुक्यातील श्रीक्षेत्र येवती येथे नराशाम महाराज जागृत मठ संस्थान आहे. या संस्थानचे मठाधिपती नराशाम महाराज यांचा ४७ वा वाढदिवस सेवा समितीतर्फे मठ संस्थान येवती (लघु आळंदी) येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी नराशाम महाराज यांची औक्षवंत, पाद्यपूजा, ग्रंथतुला करण्यात आली. यावेळी ३१ सुहासिनी यांनी नराशाम महाराज यांना औक्षवंत करून शुभेच्छा दिल्या. सेवा समितीच्या वतीने यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मठ संस्थानामार्फत मे २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पवित्र श्री पशुपतिनाथ यात्रेची माहितीही भाविकांना देण्यात आली. यात्रेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी आपली नावे लवकरात लवकर नोंदवावीत, असे आवाहन सद्‌गुरू सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.


इकडचं तिकडचं


## उपाययोजनांवर कोण बोलणार..?

नांदेडच्या रजिस्ट्री ऑफिसचा चौक. बाजूलाच टॅक्सी पॉइंट आणि रजिस्ट्री ऑफिसच्या कामासाठी आलेली मंडळी, त्यामुळे नेहमीप्रमाणे गजबजलेला. उन्हापासून बचाव करण्यासाठी सावली शोधणाऱ्यांची लगबग. घोळक्या-घोळक्यात तीनच विषयांभोवती फिरणारी चर्चा. एफडीए सचिव तुकाराम मुंढे साहेबांचा हाबाडा, नांदेड विधानपरिषद निवडणूक अन् दरवर्षी वाढत जाणारी असह्य गर्मी आणि यंदाची संभाव्य दुष्काळसदृष्य परिस्थिती! त्यातही गर्मी व दुष्काळावर बोलणारी तोंडेच जास्त.

तिथे एक माजी सैनिक शांतपणे उभे राहिले होते. एकदम स्थितप्रज्ञ. मी त्यांना सहजच म्हणालो की, 'या चर्चेपासून तुम्ही अलिप्त का?'

ते म्हणाले, 'विधान परिषद निवडणुकीवर भाष्य करण्यात मला अजिबात रस नाही, कारण इथला मतदार 'संपर्क' कसा झाला आणि 'बडदास्त' कशी ठेवली यावरच आज मतदान करेल. मुंढे साहेबांविषयी नितांत आदर आहे, असे फक्त पाच-पन्नास अधिकारी देशात असायलाच हवेत. राहिला गर्मीचा विषय, तर मला सांगा साहेब -सीमेवरचा जवान, शेतातला शेतकरी आणि स्वयंपाकघरातली स्त्री, हे सगळे पंख्याविना, पण तरीही हसतखेळतच आपले कर्तव्य बजावत असतात ना? त्यांना गर्मीचा त्रास होत नसेल का? वाढत्या गर्मीची चर्चा फक्त एसीत राहणाऱ्यांच्या व स्वतः एकही झाड न लावलेल्यांच्याच कॉलन्यात जास्त का ऐकू याव्यात? मला वाटते की, समस्यांवर चर्चा करण्यात वेळ व्यर्थ घालविण्यापेक्षा उपाययोजनांवर बोललं पाहिजे व त्यावरील अंमलबजावणीसाठी प्रत्येकाने आपापले योगदान प्रामाणिकपणे दिले पाहिजे. पण इथे असं होत नाही. लोकांना नको त्या चर्चेत गुरफटून ठेवण्यात इथली व्यवस्था तरबेज आहे.

दोनच मिनिटांच्या बोलण्याने पठ्ठ्याने आम्हाला अंतर्मुख व्हायला भाग पाडलं. उपाययोजनांवर कोणीच का बोलत नसेल आणि नको त्या प्रश्नांवर जनतेला गुरफटून ठेवणं नेमकं कुणाच्या पथ्यावर पडतं?

**शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

## नागोराव टापरे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जवळच्या वाजेगाव बायपास टापरे चौक येथील रहिवासी नागोराव टापरे यांचे मंगळवार, दि. १६ जून रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. १७ जून रोजी जुना पूल वाजेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



मृत्यूसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. त्यांच्या पश्चात एक भाऊ, तीन मुली, दोन मुले, नातू, पणतू असा परिवार आहे. पत्रकार आनंदा बोकारे यांचे ते सासरे होत.

## मनपाच्या वतीने महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)** –महापालिकेच्या वतीने वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह जयंतीनिमित्त शहरातील महाराणा प्रताप चौक येथील त्यांच्या अश्वारुढ पुतळ्यास बुधवार, दि.१७ जून रोजी सकाळी ७.३० वाजता पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

वीर शिरोमणी महाराणा प्रताप हे मेवाडचे महान राजपूत राजे आणि स्वाभिमानाचे प्रतीक होते. त्यांनी मुघल सम्राट अकबराचे स्वामित्व कधीही स्वीकारले नाही आणि मातृभूमीच्या रक्षणार्थ शेवटपर्यंत संघर्ष केला. महाराणा प्रतापसिंह यांनी आपल्या अजोड शौर्याने, पराक्रमाने आणि मातृभूमीवरील स्वाभिमानाने इतिहास अजरामर केला. त्यांचा हा जाज्वल्य इतिहास आणि राष्ट्रप्रेम प्रत्येक नागरिकासाठी, विशेषतः युवा पिढीसाठी सदैव प्रेरणादायी आहे.

याप्रसंगी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त नितीन गाढवे, उपायुक्त अभिजित वायकोस, उपायुक्त नितीन गाढवे, मुख्य उद्यान अधीक्षक डॉ. फरहतुल्ला बेग, क्षेत्रिय अधिकारी राजेश जाधव, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे, वरिष्ठ लिपीक गिरीश काठीकर, आनंदा खानसोळे यांच्यासह पालिकेचे कर्मचारी व राजपूत समाजातील प्रतिष्ठित नागरिकांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड परिमंडलात परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यातील नीट परीक्षार्थींसाठी दि. २१ जून २०२६ रोजी नीट परीक्षा (नॅशनल ईलिजीबिलीटी कम इन्ट्रन्स टेस्ट) नियोजित आहेत. नांदेड जिल्ह्यात ४२ तर परभणी जिल्ह्यात १४ केंद्रांवर दुपारी २ ते ५:१५ या वेळात त्या परीक्षा होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर परीक्षा काळात परीक्षा केंद्रांवर सुरळीत वीज पुरवठ्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे निर्देश मुख्य अभियंता राजाराम माने यांनी दिले आहेत.

तीनही जिल्ह्यांचे अधीक्षक अभियंता व नांदेड शहर, नांदेड ग्रामीण, भोकर, देगलूर, परभणी, सेलू आणि हिंगोली विभागांचे कार्यकारी अभियंता यांना सुरळीत वीज पुरवठ्यासंदर्भात लेखी पत्राव्दारे कळविले असून, संबंधित शाखा अभियंता, उपविभागीय अधिकारी यांनीही परीक्षा कालावधीच्या आधी प्रत्यक्ष परीक्षा केंद्रांना भेटी देऊन आवश्यकतेनुसार वीज पुरवठ्याशी संबंधित उपाययोजना करुन त्याचा अहवाल तत्काळ परिमंडल कार्यालयास सादर करण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

## प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्यांची विविध मागण्यांसाठी निदर्शने ; मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचा पाठिंबा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड प्रादेशिक परिवहन कार्यालयात विविध मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांचा मंगळवार, दि. १६ जूनपासून बेमुदत संप सुरू आहे. सदर संपाच्या दुसऱ्या दिवशी बेमुदत संपास नांदेड जिल्हा मध्यवर्ती कर्मचारी संघटनेने पाठिंबा दिला असल्याचे पत्र अध्यक्ष नरमवार यांना दिले आहे.



प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर उपस्थित असलेल्या प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्यांना नरमवार यांनी मार्गदर्शन करून यावेळी मोटार वाहन विभाग संघटनेच्या मागण्या ह्या रास्त असून, यामध्ये शासनाला कोणताही आर्थिक भुर्दंड नसतानाही कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासनाकडून विनाविलंब मंजूर केल्या पाहिजे. पाठिंबा देण्यासाठी मध्यवर्ती संघटनेचे साले व सरोदे उपस्थित होते. प्रादेशिक परिवहन कार्यालय कर्मचारी संघटना नांदेडमधील सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयासमोर निदर्शने केली. प्रमुख मागण्या वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी आणि प्रशासकीय अधिकारी या पदांच्या पदोन्नतीचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर प्रलंबित असून, तो तातडीने मंजूर करावा, कार्यालय अधीक्षक पदाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात यावेत, सहायक मोटार वाहन अभियंता पदाचे सेवानियम नसल्यामुळे विभागातील विधी पदवीधरांना नियुक्ती मिळत नाही, त्यामुळे सेवानियम तयार करावेत, वर्ग-३ संवर्गातील सर्व पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्यात यावेत, लिपीक टंकलेखक आणि वरिष्ठ लिपीक या पदांची नावे बदलून अनुक्रमे परिवहन सहायक आणि वरिष्ठ परिवहन सहायक करण्यात यावेत आदी मागण्यांसाठी निदर्शने करण्यात आली.

यावेळी आर. एन. गोरे. एस. आर.केंद्रे, आर. एल. गाजुलवाड, जी. एम. शिंदे, आर. एच. कंधारकर, जि. के. पवळे, एन. आर. देवदे, दिलीप गाडचेलवार, पी. पी. सातपुते, पी. जी. मरवाळे, रवी सानप, ए. एस. केंद्रे, एम. डी. पोकले, एन. जी. कुंडगीर, एस. जी. कोंगलवार, भगीरथ ठाकरे व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## नांदेड पॅटर्न बावन्नकशीच : एमएचटी सीईटी २०२६ मध्येही 'केसीसी' अव्वल



**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी घेतलेल्या एमएचटी-सीईटी पीसीबी निकाल २०२६ हा नुकताच जाहीर केला आहे. या निकालातही आपल्या नावलौकिकास साजेशी अशी कामगिरी करताना नांदेड येथील कोनाळे क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तेचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. या वर्षीच्या निकालाचे वैशिष्ट्ये म्हणजे तब्बल २४२ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक पर्सेंटाईल प्राप्त केले असून, यातील ३० विद्यार्थ्यांनी ९९ पेक्षा जास्त पर्सेंटाईल प्राप्त केले आहेत.

कोनाळे क्लासेसच्या जेईई मेन्स २०२६ च्या निकालात कृष्णा शिंदे या विद्यार्थ्यांने फिजिक्समध्ये १०० पैकी १०० गुण प्राप्त करून ऐतिहासिक कामगिरी नोंदविली होती. तर एमएचटी सीईटी २०२६ मध्ये अनुष्का अतुल कवटीकवार या विद्यार्थिनीने केमिस्ट्री विषयात १०० परसेंटाइल मिळवित केसीसीच्या गुणवंतांच्या आलेखात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे

कोनाळे कोचिंग क्लासेसने आपल्या २८ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक वाटचालीत हजारो डॉक्टर, इंजिनिअर घडविले आहेत आणि ही परंपरा अखंडितपणे सुरू आहे. यावर्षीच्या गुणवंत विद्यार्थ्यात कु. अनुष्का अतुल कवटीकवार हिने ९९.९९ पर्सेंटाईल तर सोहम ज्ञानेश्वर धम्मेवार याने ९९.९२ तसेच प्रथमेश निवृत्ती तांदळे याने ९९.९१, निखिल सतिश निर्पणे याने ९९.९१ व आशिष राजू ताटे याने ९९.८७ उच्चांकी गुण प्राप्त केले आहेत. याशिवाय तब्बल ३० विद्यार्थ्यांनी ९९ पेक्षा अधिक पर्सेंटाईल प्राप्त केले आहे. शिवाय ९८ पर्सेंटाईलपेक्षा जास्त गुण मिळविणारे ५८ पेक्षा अधिक विद्यार्थी आहेत तर ९७ पेक्षा अधिक पर्सेंटाईल प्राप्त करणारे तब्बल ८३ विद्यार्थी असून, ९० पेक्षा अधिक पर्सेंटाईल मिळविणारे २५० पेक्षा अधिक विद्यार्थी आहेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी केसीसीचे ३३० पेक्षा अधिक विद्यार्थी हे नामांकित इंजिनिअरिंग कॉलेजसाठी प्रवेशास पात्र ठरतील असा विश्वास व्यक्त करतानाच प्रा. व्ही. डी. कोनाळे यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com